# बिसेन डेन्टल केअर
डॉ.दिप(पंकज) बिसेन डॉ.खुशबू बिसेन(पटले)

दंत व मुख रोगविशेषज्ञ
बी.डी.एस.(नागपूर)

ताज मेरीप्लेक्स, गर्ल्स कॉलेज रोड गोंदिया
सकाळी:- ११ ते ३ सायं ६ ते ९ वाजेपर्यंत संपर्क:- ९५४५६८१८७०



साप्ताहिक http://berartimes.com

# बेरार टाईम्स

मुख्य संपादक :- खेमेंद्र कटरे, सहसंपादक :- सुरेश भदाडे





गोंदिया शहरात बेरार टाईम्सचा अंक चौरसिया पान सेंटर जयस्तंभ चौक गोंदिया येथे उपलब्ध



आर.एन.आय.क्र. एमएएचएमएआर/२०११/४६५१० | वर्ष -१३ गोंदिया | अंक ०३ | बुधवार,दि.२७ डिसेंबर २०२३ | पृष्ठ-४ | किंमत-३ रुपये | Postal Reg.No.NPMFL/107/2022-2024


## पारवे,कडूंना एक,तर केदारांना दुसरा न्याय का?

### आमदार अपात्रतेप्रकरणी काँग्रेसचा सवाल


सुधीर पारवे


बच्चू कडू


सुनील केदार

**नागपूर :** जिल्हा सहकारी बँक घोटाळयात काँग्रेस नेते सु-नील केदार यांना सत्र न्यायालयाने पाच वर्षांच्या कारावासाची शिक्षा सुनावली व दुसऱ्याच दिवशी (शनिवारी) विधिमंडळ सचिवालयाने त्यांचे विधानसभेचे सदस्यत्व रद्द केले. मात्र २०१५ मध्ये भाजपचे उमरेडचे तत्कालीन आमदार सुधीर पारवे आणि २०२३ मध्ये महायुतीला पाठिंबा देणारे प्रहारचे विद्यमान आमदार बच्चू कडू यांना वेगवेगळया प्रकरणात न्यायालयाने दोषी ठरवले. पण, त्यांना वरिष्ठ न्यायालयात जाण्याची संधी देण्यात आली. तेथे त्यांच्या शिक्षेला स्थगिती मिळाल्याने ते कारवाईपासून बचावले. त्यामुळे सत्ताधाऱ्यांना एक व तर विरोधी पक्षातील आमदारांना वेगळा न्याय का, असा सवाल काँग्रेसने केला.

दोन दशकांहून अधिक काळ न्यायालयात प्रलंबित असलेल्या जिल्हा बँकेच्या रोखे घोटाळयात काँग्रेसचे विद्यमान आमदार सु-नील केदार यांना जिल्हा सत्र न्यायालयाने २२ डिसेंबर २०२३ ला पाच वर्षे कारावास व १२.५० लाखांच्या दंडाची शिक्षा सुनावली. लगेच दुसऱ्या दिवशी लोकप्रतिनिधी कायद्यानुसार त्यांचे विधानसभा सदस्यत्व रद्द करण्यात आले. त्यांना वरिष्ठ न्यायालयात दाद मागण्याची संधीच देण्यात आली नाही. दुसरीकडे सत्ताधारी पक्षाच्या आमदारांबाबत मात्र अशी तत्परता दाखवण्यात आल्याचे यासंदर्भातील घटनाक्रमावरुन दिसून येत नाही. २४ एप्रिल २०१५ मध्ये भाजपचे तत्कालीन आमदार सुधीर पारवे यांना शिक्षकाला मारहाण प्रकरणात भिवापूर प्रथमश्रेणी न्याय दंडाधिकाऱ्यांनी दोन वर्षांची शिक्षा सुनावली होती. मात्र त्यांना वरिष्ठ न्यायालयात जाण्यासाठी अवधी देण्यात आला.

त्यांनी उच्च न्यायालयात दाद मागितली. तेथे १४ मे २०१५ ला शिक्षेला स्थगिती दिली. त्यामुळे पारवे यांची आमदारकी बचावली. तेव्हा राज्यात भाजपच्या नेतृत्वाखालील युतीची सत्ता होती. यंदा प्रहारचे आमदार बच्चू कडू यांना सरकारी कामात हस्तक्षेप व अधिकाऱ्यांवर हात उगारण्याच्या प्रकरणात नाशिक जिल्हा सत्र न्यायालयाने ८ मार्च २०२३ ला दोन वर्षांची शिक्षा सुनावली.

## भीषण अपघातात चौघांचा मृत्यू,पाच जखमी

**गोंदिया**–तालुक्यातील दांडेगाव येथे टवेरा वाहनाला अपघात होऊन चौघांचा मृत्यू तर पाच ते सहा प्रवासी जखमी झाल्याची घटना घडली आहे. दोघांचा घटनास्थळी तर दोघांचा रुग्णालयात नेतांना मृत्यू झाला. जखमींना तात्काळ उपचारासाठी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व के. टी. एस. रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

तिरोडा तालुक्यातील करटी बुजूर्ग येथील साक्षगंध समारंभानिमित्त वऱ्हाडी हे टवेरा वाहनाने गोंदिया तालुक्यातील दांडेगावच्या चौकात २६ डिसेंबर रोजी मौजा दांडेगाव येथे गोंदिया तिरोडा महामार्गावर तिरोडा करटी वरुण गोंदिया कडे मजीतपुर येथे उइके कुटुंबीयच्या घरी साक्षगांधच्या कार्यक्रम निमित्त वरात घेऊन जात असता दांडेगाव येथे भरधाव वेगाने येत असलेल्या टवेरा वाहन (चक ४०,अ ४२४३) च्या ड्राइवर अतुल नानाजी पटले (२३) वर्ष राहणार अर्जुनी परसवाडा यांनी वेगात असलेल्या वाहनाचे एकदम ब्रेक लावल्यामुळे सदर वाहन हे दोन तीन पलट्या घेत राज्य महामार्गावरील दांडेगाव येथे डाव्या बाजूला लागून असलेल्या रोहिणी प्रसाद बिरणववार (रा. दांडेगाव) यांच्या घराच्या अंगणात विद्युत पोललगत असलेल्या विटांच्या ढिगाऱ्यावर जाउन आदळल्याने मोठा अपघात झाला.अपघात स्थळावर दोन महिलांचा मृत्यू झाला. मृतांमध्ये छाया अशोक इनवाते (रा. करटी), अनुराधा हरिचंद कावळे (रा. करटी), तसेच एक पंधरा महिन्याच्या चिमुकल्याचा सामान्य रुग्णालय उपचारादरम्यान मृत्यू झाला. एका मृताचे नाव कळू शकले नाही. या अपघातात गीता प्रितिचन्द इनवाते (५५ रा. करटी ता. तिरोडा), पदमा राजकुमार इनवाते (५० रा. भुराटोला तिरोडा), बिरजुला गुडन ठाकरे (३५ रा. आरम्भाघोटी जि. बालाघाट), अहिल्याबाई नामदेव कोडवाते (६२ रा. करटी तिरोडा), तसेच वाहन चालक अतुल नानाजी पटले (२३ रा. अर्जुनी परसवाडा) यांच्यावर के.टी.एस . जिल्हा सामान्य रुग्णालय गोंदिया येथे उपचार सुरु आहेत. तपास पोलीस निरीक्षक बनसोडे यांच्या मार्गदर्शनात सुरु आहे.

### नववर्षाच्या पार्श्वभूमीवर पोलीस विभागाची करडी नजर

**गोंदिया:** ३१ डिसेंबर व नववर्ष आगमनाच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यात दिनांक २७ डिसेंबर २०२३ ते २ जानेवारी २०२४ पर्यत विशेष मोहीम राबवून जिल्ह्यातील अवैध व्यवसाय दारु, जुगार, सट्टा, गांजा इत्यादी प्रकारच्या सर्व अवैध व्यवसायांवर मोठ्या प्रमाणात धाड सत्र राबविण्यात येणार आहे. असे पोलीस अधीक्षक निखिल पिंगळे यांनी सांगितले. पोलीस अधीक्षक कार्यालयात जिल्हास्तरीय अंमली पदार्थ विरोधी कार्यकारी समितीची बैठक आयोजित करण्यात आली होती, त्यावेळी श्री. पिंगळे बोलत होते. यावेळी अपर पोलीस अधीक्षक नित्यानंद झा, पोलीस निरीक्षक दिनेश लबडे, औषधी निरीक्षक अभिषेक चवरडोल, मुख्य पोष्ट मास्टर अनिलकुमार कटरे, जिल्हा शल्यचिकित्सक यांचे प्रतिनिधी डॉ. बी.डी. जायस्वाल, वस्तु व सेवाकर विभागाचे पी.एन.मालठाणे, उपविभागीय अधिकारी यांचे प्रतिनिधी व्ही.डी.झाडे उपस्थित होते.

## दिपीका आली अर्ध्या खेळाडूंना पुरस्कार देऊन लगेच निघून गेली!!



### कलावंताच्या प्रतिक्षेत विद्यार्थी झोपले

**शहीद जाम्या-तिम्या जिल्हा परिषद हायस्कूलच्या भव्य पटांगणात आयोजित अटल क्रीडा आणि सांस्कृतीक महोत्सवाच्या पुरस्कार वितरण सोहळ्याला खेळाडू,विद्यार्थी, शिक्षक व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.दरम्यान पुरस्कार वितरण खूप उशिरा चालल्याने लहान चिमुकले विद्यार्थी अक्षरश: झोपी गेले होते. तर या खेळाडू विद्यार्थ्यांना जेवण ही अपुरे मिळाल्याची चर्चा पालकांसह शिक्षकात होती. या कार्यक्रमाच्या नियोजनातील चुकांमुळे अनेक शिक्षक वर्ग नाराज दिसून आला.**

**गोरेगाव:** तब्बल पाच वर्षानंतर जिल्हा परिषेदेने यंदा अटल क्रीडा व सांस्कृतीक महोत्सवाचे आयोजन केले होते. यात जि.प.च्या शाळांमधील हजारो विद्यार्थ्यांनी सहभागी होऊन आपल्या कला-गुणांचे सादरीकरण केले. या खेळाडूंना पुरस्कार वितरण करणाऱ्याकरिता रामायणातील सीता फेम दिपीका चिखलिया व इतर कॉमेडी कलावंतांना पाचारण करण्यात आले होते. ज्या कलावंताच्या हा-तून आपणास पुरस्कार मिळेल ही आशा बाळगून असलेल्या अनेक खेळाडूंच्या पदरी निराशा पडली. दिपीकासह कॉमेडी कलावंत आले. पाच-दहा मिनट हाय हॅलो करुन निघून गेले. मात्र या कलावंतांच्या नावावर रात्रीच्या उशीरापर्यंत लहान बालकांना वेठीस धरुन ठेवण्यात आले. शेवटी उर्वरित पुरस्काराचे वितरण ही जिल्हा परिषद अध्यक्ष व पदाधिकाऱ्यांच्या हस्तेच वितरित करण्यात आले. सदर कार्यक्रमाला मोजक्याच जिल्हा परिषद सदस्यांनी हजेरी लावली. समारोप कार्यक्रम हा जिल्हा परिषदेचा सर्वांगीण न राहता भाजपमय झाल्याची टिका अनेकांनी केली. सोबतच शिक्षण विभागाचे सभापती, सीईओ, व शिक्षणाधिकारी हे मात्र या पूर्ण कार्यक्रमाचे कागदोपत्रीच संयोजक राहिल्याचे चित्र समारोप कार्यक्रमात बघावयास मिळाले.

या समारोपीय कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानावरुन बोलतांना जि.प. अध्यक्ष पंकज रहांगडाले यांनी या माध्यमातून विद्यार्थ्यांना व्यासपीठ मिळाले आहे. या क्रीडा सांस्कृतीक महोत्सव-ातून अनेक प्रतिभावंत खेळाडू घडतील. त्यामुळे या महोत्सवाचे आयोजन आता दरवर्षी केले जाईल अशी ग्वाही दिली. अटल



क्रीडा व सांस्कृतीक महोत्सवा-ाचा पारितोषीक वितरण कार्यक्रम सोमवारी स्थानिक शहीद जाम्या-तिम्या हायस्कूल पटांगणावर आयोजित करण्यात आले होते. याकरिता विशेष अतिथी म्हणून कलावंत व माजी खासदार दिपीका चिखलिया, जॉली मुखर्जी, विजय पवार आमंत्रीत करण्यात आले होते. कार्यक्रमाला खा.सुनील मेंढे, आ.विजय रहांगडाले, विनोद अग्रवाल, आ.मनोहर चंद्रीकापुरे, मुख्य कार्यकारी अधिकारी अनिल पाटील, शिक्षणाधिकारी महेन्द्र गजभिये, माध्यमिक्ष शिक्षणाधिकारी कादर शेख, माजी आ.हेमंत पटले, खोमेश्वर रहांगडाले, भेरसिंह ना-गपुरे, माजी पालकमंत्री राजकुमार बडोले, डॉ. परिणय फुके, भाजप जिल्हाध्यक्ष येसुलाल उपराडे, गोरेगाव पंचायत समितीचे सभापती मनोज बोपचे, जि.प.सभापती सविता पुराम,पूजा सेठ, भाजप जिल्हा महामंत्री विरेंद्र अंजनकर, माजी नगराध्यक्ष आशिष बारेवार, माजी जिल्हा परिषद अध्यक्ष ने-तराम कटरे, उपस्थित होते.

### अटक क्रीडा व सांस्कृतीक महोत्सवाचे पारितोषीक वितरण

### खासदारांनी व्यक्त केली नाराजी

**या कार्यक्रमांमध्ये भंडारा-गोंदिया लोकसभा क्षेत्राचे खा.सुनील मेंढे यांनी गोंदिया जिल्हा परिषदेच्या अधिकाऱ्यांवर नाराजी व्यक्त केली. यानंतर लोकप्रतिनिधींना निमंत्रण घायला विसरु नये. तसेच यापुढे असा प्रकार खपून घेतला जाणार नाही असे सांगत अधिकाऱ्यांना खडेबोल सुनावले त्यामुळे कार्यक्रमस्थळी याची जोरदार चर्चा होती.**

### समितीत नसलेलेही मंचावर

**बक्षीस वितरण सोहळ्याकरिता जी समिती तयार करण्यात आली. त्या समितीमधीलच शिक्षकांनी मंचावर असावे असा फतवा काढून एका शिक्षकाला मंचावरुन हाकलले गेले. मात्र त्याच बक्षीस वितरणाच्या कार्यक्रमात समितीत नाव नसलेल्या शिक्षीका मात्र मंचावर पूर्णवेळ उपस्थित राहून पुरस्कार वितरणात सहभागी होत होत्या. त्यामुळे त्या नाव नसलेल्या शिक्षीका कशा मंचावर राहिल्या,यावर शिक्षकांमध्ये चांगलीच चर्चा रंगली व त्या अधिकाऱ्याच्या भूमिकेचा दबक्या आव-ाजात निषेध ही नोंदविला.**

## वसतिगृह प्रवेशासाठी आता जातवैधतेची अट

**गोंदिया:** इतर मागास बहुजन कल्याण (ओबीसी) विभागाने व्यावसायीक अभ्यासक्रमासह पदवीच्या विद्यार्थ्यांना वसतिगृहात प्रवेश देण्याचा निर्णय घेतला आहे. परंतु, यासाठी जातवैधता प्रमाणपत्र बंधनकारक केले आहे. वैधता प्रमाणपत्र बिगर व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांना मिळत नाही. त्यामुळे अनेक विद्यार्थी वसतिगृह प्रवेशापासून वंचित राहण्याची शक्यता आहे.

ओबीसी वर्गातील विद्यार्थ्यांसाठी वसतिगृह सुरु करण्याची मागणी आहे. शासनाने सर्व जिल्ह्यात दोन वसतिगृह सुरु करण्याचा निर्णय घेतला. परंतु अद्याप त्याची अंमलबजावणी केली नव्हती. आता ते सुरु करण्याचे आदेश शासनाने दिले आहे. दोनशे विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात येणार असून, यात १०० मुली व १०० मुलांचा समावेश असणार आहे.

ओबीसी विभागाने व्यावसायीक अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांना वसतिगृहात प्रवेश देण्याचा निर्णय घेतला आहे. वसतिगृहात प्रवेशासाठी विभागाने २० अटी घातल्या आहेत. यात जातवैधता प्रमाणपत्र (कास्ट व्हॅलिडिटी) बंधनकारक असल्याची अट टाकण्यात आली आहे. विशेष म्हणजे, व्यवसायीक अभ्यासक्रमासाठी जातवैधता प्रमाणपत्र देण्यात येत नाही. त्यामुळे या नव्या अटीने या विद्यार्थ्यांना प्रवेशाला मुकावे लागण्याची शक्यता आहे.

## कुंवर तिलकसिंह नागपुरे यांच्या नावापुढे“हुतात्मा”लावा

**गोंदिया-कुं**वर तिलकसिंह नागपुरे यांच्या ११४ व्या जयंती कार्यक्रम निमित्त त्यांच्या सामाजिक कार्य आणि लोककल्याणकारी कार्याचे जन सामान्यांपर्यंत माहिती पोचविणे अत्यंत आवश्यक आहे.संपूर्ण महाराष्ट्रातील दानदात्यांची नावे काढली असता प्रमुख १० दानदात्यांमध्ये तिलकसिंह यांचे नाव येईल.जमीन सामाजिक आणि सेवेला समर्पित करत दान करण्याचे कार्य केले आहे. आजच्या काळात तर ५००-७०० कोटी पर्यंत किमंत होईल. एवढ्या अवाढव्य संपत्ती दान करण्याचे धाडस अश्या समाजसुधारकांचे कामे जनसामान्यपर्यंत पोचविणे काळाची गरज असून भविष्यात सामाजिक क्षेत्रात कार्य करू पाहणाऱ्या समाज सुधारकांना प्रेरणादायी कार्य तिलकसिंह यांचे आहेत. त्यांच्या सन्मान म्हणून त्यांच्या नावापुढे ‘हुतात्मा’ लावून निश्वार्थ सेवेला जगापुढे आणण्याचे कार्य करणे आहे, असे विधान आमदार विनोद अग्रवाल यांनी व्यक्त केले.

## बनावट पदवीवर नोकरी? जि.प.कधी करणार चौकशी,अपात्र उमेदवारांना पदोन्नतीचा घाट



**गोंदिया:**– गोंदिया जिल्ह्या-तील विविध विभागात विशेष करुन सार्वजनिक बांधकाम विभाग, महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजना आदीसह विविध विभागात महाराष्ट्रात नसलेल्या व गैरमान्यता असलेल्या परराज्यातील विद्यापीठांच्या पदव्या घेऊन नोकरी मिळवून पदोन्नती घेणाऱ्यांची सखोल चौकशी जिल्हा परिषद कधी करणार अशा प्रश्न उपस्थित झालेला आहे.

गेल्या अनेक महिन्यापासून जिल्हा परिषदेच्या सामान्य प्रशासन विभागाच्या वतीने पदोन्नतीकरीता बांधकाम विभागासह इतर विभागातून फाईलचा पाठपुरावा सुरु करण्यात आला.मात्र त्या फाईलमध्ये लागलेल्या पदव्या या खरंच आहेत की बोगस याचा तपास करण्याची सवळ मिळालेली नाही. एकीकडे महाराष्ट्र राज्याच्या नागपूर येथील हिवाळी अधिवेशनात बोगस पदव्यांच्या प्रश्न उपस्थित होऊन परदेशात सुध्दा १०० च्यावर युवकांनी बोगस पदवी सादर करुन नौकरी मिळविल्याचे समोर आलेले असतांना गोंदिया जिल्हा परिषदेच्या बांधकाम विभागासह प्राथमिक व माध्यमिक शिक्षण विभागात नौकरीला लागलेल्यांच्या पदव्यांचा शोध न घेताच पद्द-ोन्नतीचा सपाटा हा पात्र व योग्य उमेदवारांवर अन्याय करणारा ठरला.या सर्व प्रकरणाचाही तपास राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी परदशेतील बोगस पदवीप्रकरणासारखीच करण्याची गरज निर्माण झाली आहे.

येथील जिल्हा परिषदेचा बांधकाम विभाग सातत्याने विविध विषयाला घेऊन चर्चेत राहत असून आत्ता स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यकांच्या नियमबाह्य पदोन्नतीने पुन्हा चर्चेत आले आहे.सध्या जिल्हा परिषदेत शासन निर्णयांना तिलांजली देत २-३ वर्षापासून पदोन्नत्या देण्याचा सपाटा सुरु झालेला आहे. त्यामध्येच बांधकाम विभागाने गेल्या वर्षभरापासून नियमबाह्यरित्या स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यकांना कनिष्ट अभियंता पदावर पदोन्नती दिल्याचे प्रकरण समोर आले आहे.

शासन ५० वर्ष पूर्ण होण्याचा दिनांक ग्राह्य धरा असे म्हणत असतांना बांधकाम विभागाने ४५ वर्ष पूर्ण होण्याचा दिनांक ग्राह्य धरण्याचे कारण काय असे अनेक प्रश्न यामाध्यमातून उपस्थित झाले आहेत.जिल्हा परिषदेच्या बांधकाम विभागात पुन्हा पदोन्नत्यांच्या फाईल सरकवण्यास वेग आला असून अपात्र उमेदवाराकरीता कार्यकारी अभियंता स्वतःच नियमावली तयार करीत असल्याची चर्चा असतांना व बांधकाम विभागात सातत्याने गोंधळ सुरु असताना बांधकाम सभापती मात्र कार्यकारी अभियंत्याच्या चुकीच्या कामांवर सातत्याने पांघरुण का घालत आहेत असा प्रश्न उपस्थित झा-लेला आहे.

या पदोन्नत्या देतांना कार्यकारी अभियंता व सामान्य प्रशासन विभागाने नियमांची पायमल्ली करून व्यवहारिक असणाऱ्या काही स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यकांना कनिष्ट अभियंता या पदावर शासनाच्या ११ ऑगस्ट २०२२ च्या परिपत्रकाला वाटाण्याच्या अक्षता दाखविल्या आहेत. दुरशिक्षण पदविका/पदवी या मान्यता प्राप्त विद्यापीठातूनच असणे आवश्यक असल्याचे २०१७ चे शासन परिपत्रक असतांनाही त्या शासन निर्णयाला डावलण्याचे काम बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता करीत असल्यामुळेच २०१७ नंतर सुध्दा बोगस पदवीका/पदवी प्राप्त करणार्यांना पदोन्नतीचा लाभ दिल्याची चर्चा आहे.

या शासन निर्णयात स्पष्टपणे पदोन्नतीकरीता विभागीय व व्यवसायिक परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून सूट हवी असल्यास वयाची ५० वर्ष सुट किंवा शासन सेवेत वयाचे १५ वर्ष सेवा पूर्ण झाल्याचा दिनांक यापैकी जे नंतर घडेल त्यानंतर लगतचा दिनांक हा कर्मचार्य्स पदोन्नतीकरीता विभागीय व व्यवसायिक परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून सूट देण्याचा दिनांक समजण्यात येईल असा स्पष्ट उल्लेख आहे.असे असतानाही जिल्हा परिषदेच्या बांधकाम विभागाने या गेल्या काही आर्थिक वर्षात केलेल्या सर्व कनिष्ठ अभियंत्याच्या पदोन्नत्या या नियमबाह्य पध्दतीने केलेल्या आहेत. जिल्हा परिषदेत आर्थिक व्यवहाराचे सोपस्कार पार पाडून या नियमाला बगल देत शासन नियमाची अवहलेना करणे सुरु आहे. पदोन्नतीकरीता ५० वर्ष पुर्ण दाखवून अपात्र लोकांनाही लाभ मिळवून देण्याचा नवा फंडा आर्थिक सोपस्कारातून सुरु असल्याची चर्चा आहे.

या सर्व नियमबाह्य पदोन्नती प्रकरणाची तपासणी मुख्य कार्यकारी अधिकारी यांनीही न करता त्या पदोन्नती फाईलवर स्वाक्षरी करुन बांधकाम विभागाच्या गैरव्यवहाराला हातभार लावल्यासारखेच होत आहे.गेल्या २-३ वर्षातील प्रकरणाची चौकशी केल्यास ३-४ पदोन्नत्या या नियम बाह्य झाल्या असून त्या स्थापत्य अभियांत्रिकीच्या पदव्या या खरंच मान्य आहेत की नाही याचीही साधी चौकशी विभागाने संबधित विभागाकडून केले नसल्याची चर्चा आहे.

स्थापत्य अभियांत्रिकी सहायक या पदावरून कनिष्ट अभियंता पदावर पदोन्नती देतांना शासन निर्णयानुसार स्थापत्य अभियांत्रिकी सहायक पदावर कम ‘चारी स्थायी असावा.अहर्ता परीक्षा उत्तीर्ण असावा. व्यावसायिक परीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक (पदवी/पदविका धारण करणाऱ्या कर्मचाऱ्यांना बंधनकारक नाही). त्यातच विभागस्तर व व्यावसायिक परीक्षा उत्तीर्ण पासून सूट हवी असल्यास ५० वर्ष पूर्ण किंवा सेवेची १५ वर्ष पूर्ण होण्याची जी तारीख नंतरची असेल ती पकडण्यात यावे असे म्हटलेले असतानाही या नियमालाही फाटा देण्यात आलेला आहे. जिल्हा परिषदेच्या बांधकाम विभागाच्या कार्यप्रणालीकडे बघितल्यास शासनाने ठरविलेल्या निकषांची अवहेलना करुन अर्थपूर्ण व्यवहारातून पदोन्नती प्रकरणे हाताळले जात असल्याची म्हणण्याची वेळ आली आहे.

मागील २-३ वर्षांपूर्वी झालेल्या पदोन्नती मध्ये पदोन्नत कर्मचाऱ्यांपैकी ३ कर्मचारी पूर्णपणे बेकायदेशीर पदोन्नत झाले आहेत हे उघड असूनही कोणतीही कार्यवाही अद्याप झालेली नाही. बेकायदेशीर पदोन्नत कर्मचाऱ्यांवर कुठलीही कार्यवाही न झाल्याने उर्वरित स्थापत्य अभियांत्रिकी सहायक (गट ) जे दूरशिक्षण पदविकेचे प्रमाणपत्र घेऊन बसले. त्यांनी आम्हाला पण याच आध-ारवर पदोन्नती द्या किंवा पदोन्नत कर्मचाऱ्यावर कार्यवाही करा अशी मागणी सातत्याने करीत आले आहेत.

त्यातच नुकतेच जिल्हा परिषदेच्या लघु सिंचन विभागात ए.एन.आदमने यांना दिलेली पदोन्नतीच अवैध असल्याचे समोर आले आहे.आदमने शासन निर्णयानुसार व्यवसायिक परिक्षा सुध्दा अनुत्तीर्ण आहेत.त्यातच वयाची ५० वर्षाची अट व सेवेतील १५ वर्षाची अट सुध्दा पुर्ण केलेली नसतांना कुठल्या आधारावर पदोन्नती कार्यकारी अभियंत्याने दिली हा संशोधनाचा विषय नव्हे तर विभागीय चौकशीसह पोलीस चौकशीचा विषय ठरला आहे.तर पुन्हा व्यवसायिक परीक्षा अनुत्तीर्ण व शासकीय सेवेतील १५ वर्षाची अट पूर्ण केलेली नसलेल्यांना पदोन्नती देण्याकरीता बांधकाम विभागाच्या कार्यकारी अभियंत्यानी हालचाल सुरु केल्याने जिल्हा परिषदेच्या बांधकाम विभागावर कुणाचेच नियंत्रण नसल्याचे स्पष्ट झाले आहे.

## दफ्तर दिरंगाईत रखडले रेल्वे उड्डाण पुलाचे बांधकाम




**गोंदिया :** शहरातील जुना रेल्वे उड्डाण पूल वर्षभरापूर्वीच जमिनदोस्त करण्यात आला. नवीन उड्डाण पुलाच्या बांधकामाची निविदा प्रक्रिया पूर्ण झाली असली तरी शासन व प्रशासनाच्या दफ्तर दिरंगाईमुळे रेल्वे उड्डाण पुलाचे बांधकाम शासकीय कार्यालयात अडकून आहे. त्यामुळे गोंदियातील रहिवासी एकाच उड्डाण पुलावरून धोकादायक प्रवास करत असल्याने वाहतुकीचीही समस्या निर्माण झाली आहे.

गोंदिया आणि बालाघाट या जिल्हा मुख्यालयाला जोडणारा रेल्वे पूल ब्रिटिशांच्या काळात बांधण्यात आला होता. तो जीर्ण व मुदत बाह्य झाला होता. असे असतानाही या पुलावरून वाहतूक सुरू होती. सुरक्षेच्या दृष्टीने तत्कालीन जिल्हादंडाधिकारी नयना गुंडे यांनी २ मे २०२२ रोजी या पुलावरून वाहतूक बंद करण्याचे आदेश दिले होते. सूचनेनुसार गतवर्षी जूनजुलैमध्ये पूल पाडण्यात आला. या वेळी पूल पाडल्यानंतर तातडीने नवीन पूल बांधला जाईल, अशी अपेक्षा जनता बाळगून होती मात्र तसे होऊ शकले नाही. सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत नवीन उड्डाण पुलाच्या बांधकामाची निविदा प्रकिया करण्यात आली. पुलासाठी शासनाने ४७ कोटी ६८ लाख रुपयांचा निधी मंजूर केल्याचे सांगण्यात आले.

निविदा प्रक्रिया पूर्ण होताच सप्टेंबर महिन्यापासून नवीन उड्डाण पुलाचे काम सुरू करण्यात येणार असल्याची माहिती यापूर्वी देण्यात आली, काही राजकीय पुढाऱ्यांनी डिसेंबरमध्ये बांधकाम सुरू होणार असल्याचे कार्यक्रमांमध्ये सांगीतले. आता डिसेंबरही लोटत आहे. मात्र नवीन उड्डाण पुलाच्या बांधकामाला सुरवात झाली नाही. दप्तर दिरंगाईतच पुलाचे बांधकाम रखडून आहे.

शहरातील एकमेव उड्डाण पुलावरून वाहतूक केली जात आहे. या पुलाच्या अरुंदपणामुळे वारंवार वाहतूक कोंडी होते. वाढत्या रहदारीमुळे या उड्डाण पुलावर अनेक अपघात झाले आहेत. काही महिन्यांपूर्वी पुल-ावरील अपघातात दोन तरुणांना जीव गमवावा लागला आहे. हा पूल केवळ शहरवासीयांसाठीच नव्हे तर या उड्डाण पुलावरून प्रवास करणाऱ्यांसाठीही धोक्यापेक्षा कमी नाही.

उड्डाण पुलाच्या बांधकामाची निविदा प्रक्रिया पूर्ण झाली आहे. पहिल्या टप्प्यात १५ कोटींहून अधिक निधीतून बांधण्यात येणाऱ्या उड्डाण पुलासाठी शासनाच्या संबंधित मंत्रालय स्तरावरून कार्यादेश मंजूर करण्यात आला आहे. शासनस्तरावरील प्रकिया पूर्ण होताच बांधकामाला सुरुवात करण्यात येणार असल्याचे सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता नरेश लभाणे यांनी सांगीतले होते.

मात्र घोडे कुठे अडून आहे, कुणास ठाऊक. ४७.६८ कोटी रुपये खर्चून उड्डाण पूल बांधण्यात येणार आहे. पुलासाठी शासनाकडून ४७.६८ कोटी रुपयांचा निधी मंजूर झाल्याची माहिती आहे. या निधीतून ५५३ मीटर लांबीचा नवीन रेल्वे उड्डाण पूल बांधण्यात येणार आहे. मात्र निधी मंजूर होऊन वर्ष लोटून गेले तरी बांधकामाला सुरवात झालेली नाही.

## संपादकीय

### विरोधकांनी विदर्भाला काय मिळवून दिले?

महाराष्ट्र राज्य विधिमंडळाचे नागपुरातील हिवाळी अधिवेशन बुधवारी समाप्त झाले. राज्यात पावसाळी व उन्हाळ्यातील मोजके दिवस अर्थसंकल्पिय अधिवेशन आणि हिवाळी अधिवेशन नागपूरला होत असते. नागपूर करारानुसार राज्य विधिमंडळाचे कोणतेही एक अधिवेशन नागपूरला घेणे आवश्यक आहे. राज्याच्या कानाकोपऱ्यांतील आमदारांना दळणवळणाच्या सुविधेच्या दृष्टिकोनातून मुंबई सुलभ असल्याने पावसाळी अधिवेशन मुंबईला घेतले जाते. विधिमंडळाच्या अधिवेशनात राज्यातील विकासकामांचा आढावा घेतला जात असतो. लोकप्रतिनिधींनी आपल्या विधानसभा मतदारसंघातल्या समस्या अधिवेशनात मांडाव्यात, चर्चा करावी, विकासकामांचे गांभीर्य शासन-प्रशासनाच्या निदर्शनास आणून देताना मतदारसंघाच्या विकासासाठी अधिकाधिक निधी सरकारकडून उपलब्ध करून घ्यावा, हे लोकप्रतिनिधींचे कर्तव्य तसेच कार्यही असते. तशीच अपेक्षा या अधिवेशनातून होती. नागपूर अधिवेशनातून विदर्भाच्या पदरी काहीही पडले नसल्याचे दुर्दैवाने या अधिवेशनातून पाहावयास मिळाले.

नागपूर अधिवेशन घेण्यामागचा विदर्भाचा विकास हा हेतूच या अधिवेशनात कुठेही सार्थकी लागला नसल्याचे पाहावयास मिळाले. राज्यातील विधानसभेतील विरोधी पक्षनेतेही विदर्भाचे असतानाही त्यांनी विदर्भावर चर्चा घडवून आणावी, विदर्भाच्या प्रश्नांवर सभागृह दणाणून सोडावे, विदर्भासाठी अधिकाधिक निधी उपलब्ध व्हावा यासाठी सभागृहात सरकारवर दबाव आणावा मात्र यापैकी विरोधकांनी काहीही न करावे, ही विदर्भाची शोकांतिकाच म्हणावी लागेल. अर्थात विरोधी पक्षनेत्यांसह विदर्भातील उर्वरित आमदारही तितकेच जबाबदार आहेत. विदर्भातील लोकप्रतिनिधींनी विदर्भाबाबत फारसे न बोलावे आणि निवडणुका जवळ आल्यावर याच लोकप्रतिनिधींनी विदर्भ अनुशेषाच्या नावाने प्रचारादरम्यान टाहो फोडावा, हेही आता महाराष्ट्रातील जनतेला समजून उमजून चुकले आहे. महाराष्ट्र राज्याच्या स्थापनेला ६४ वर्षांचा कालावधी लोटला असून राज्याचे मुख्यमंत्रीपद विदर्भाने तब्बल साडेअठरा वर्ष सांभाळले आहे. राज्याचे विरोधी पक्षनेतेपदही विदर्भाने अनेक वर्षे सांभाळले आहे. मुळातच सत्ताधारी व विरोधी असे दोन्ही प्रकारचे नेतृत्व विदर्भात असताना विदर्भाच्या अनुशेषावर बोलण्याचा विदर्भातील लोकप्रतिनिधींना नैतिक अधिकार कितपत आहे? एकतर हिवाळी अधिवेशन नागपूरला पर्यायाने विदर्भाच्या मातीमध्ये होत असताना अधिवेशनात विदर्भाबाबत काही बोलायचे नाही, चर्चा घडवून आणायची नाही, समस्या मांडायच्या नाही, विकासासाठी निधी मागायचा नाही आणि विदर्भाच्या अनुशेषाच्या नावाने टाहो फोडायचा हाच अधिकाधिक हिवाळी अधिवेशनादरम्यान विदर्भातील लोकप्रतिनिधींकडून एककलमी कार्यक्रम राबविला जात आहे.

विदर्भाच्या भौगोलिक पुनर्रचनेचा विचार केल्यास विदर्भाचे नागपूर आणि अमरावती असे दोन उपविभाग आहेत. विदर्भात नागपूर, अमरावती, चंद्रपूर, अकोला, वर्धा, बुलढाणा, यवतमाळ, भंडारा, गोंदिया, वाशिम, आणि गडचिरोली हे जिल्हे येतात. विदर्भाचे क्षेत्रफळ महाराष्ट्राच्या एकूण क्षेत्रफळाच्या ३१.६ टक्के आहे, तर लोकसंख्या २१.३ टक्के असल्याचे शासकीय आकडेवारी सांगते. नागपुरात ७ डिसेंबरपासून सुरू झालेले अधिवेशन २० डिसेंबरला संपले. नागपूरचे हिवाळी अधिवेशन तीन आठवडे घ्यावयाचे असते; परंतु विदर्भातील लोकप्रतिनिधींना अधिवेशनादरम्यान विदर्भावर चर्चा करण्याचे स्वारस्य नसल्याने मागील काही काळापासून हे अधिवेशन अवघ्या दोन आठवड्यांत गुंडाळले जात आहे. विशेष म्हणजे विदर्भातील लोकप्रतिनिधींना याचे काहीही सोयरसुतक नाही.

विदर्भातील जिव्हाळ्याच्या असणाऱ्या कापूस, संत्री, अवकाळी पाऊस, बेरोजगारी यावर चर्चा घडवून आणणे, राज्यातील इतर समस्यांवर सभागृहाचे लक्ष वेधून घेणे आवश्यक होते; परंतु मराठा आरक्षण, मुंबई महापालिकेच्या निवडणुका यांसह अन्य विषयावर चर्चा घडविण्यात विरोधकांनी समाधान मानले. राज्यातील समस्यांवर चर्चा घडवून आणताना विरोधी पक्षच उदासीनताच दाखवत असल्याचे या अधिवेशनादरम्यान महाराष्ट्रातील जनतेला पाहावयास मिळाले. मुळातच सत्ताधारी प्रभावी असल्याने विरोधक निष्प्रभ झाल्याचे दोन्ही सभागृहांत पाहावयास मिळाले. सत्ताधारी भाजपा, शिंदे गटाची शिवसेना आणि अजित पवार गटाची राष्ट्रवादी काँग्रेस सभागृहात प्रभावशाली दिसली. विरोधी पक्षांमध्ये काँग्रेसचा अपवाद वगळता यापूर्वीच शिवसेना व राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये यापूर्वीच मोठ्या प्रमाणावर फाटाफूट झालेली आहे. ठाकरे व शरद पवार गट गेल्या काही महिन्यांपासून हतबल झाल्याचे महाराष्ट्राच्या राजकारणात पाहावयास मिळत आहे. त्यामुळेच अधिवेशनादरम्यान राज्याच्या कारभारावरुन सत्ताधाऱ्यांना कोंडीत पकडण्यात विरोधक कोठेही प्रभावी पाहावयास मिळाले नाही. अवकाळी पाऊस यावर विरोधी पक्षांनी सरकारला कोंडी पकडण्याचे तर सोडा, पण सभागृहात प्रभावी चर्चा घडवून आणण्याची किमयाही विरोधी पक्षाला साध्य करता आलेली नाही.

मराठा आरक्षणावरुन विरोधक जरांगे-पाटलांची ढाल पुढे करत सरकारला जनसामान्यांमध्ये कोंडीत पकडण्याचा केविलवाणा प्रयत्न करत असतानाच केवळ मराठा आरक्षण या विषयावर विधिमंडळाचे फेब्रुवारी २०२४ मध्ये विशेष अधिवेशन घेण्याची राज्य सरकारने घोषणा करताना विरोधकांच्या आवेशातील हवाच काढून घेतली आहे. जेव्हा-जेव्हा शेतकऱ्यांवर संकट आले, अवकाळी पाऊस, गारपीट आदीच्या वेळेस सरकारने शेतकऱ्यांना मोठी मदत केली. कोणत्याही सरकारने केली नाही इतकी विक्रमी ४४ हजार कोटींची मदत गेल्या दीड वर्षांपासून शेती आणि शेतकऱ्यांसाठी केली आहे. धानाचा बोनस वाढवून हेक्टरी १५ हजारांच्या ऐवजी २० हजार रुपये केला आहे, अधिवेशनात विरोधी पक्ष फारसा प्रभावीपणे दिसलाच नाही. विधीमंडळाच्या हिवाळी अधिवेशन ज्यासाठी घेतले जाते, त्या विदर्भाचाही अधिवेशनादरम्यान फारसा उल्लेख झाला नाही. विदर्भाच्या भूमीवर उद्या उर्वरित महाराष्ट्राच्या हिताचे निर्णय घेतले जात असतील तर त्यास सर्वस्वी विदर्भातील लोकप्रतिनिधीच जबाबदार असतील. विदर्भातील जनतेला त्यांनाच उत्तर द्यावे लागणार आहे.

## शैक्षणिक आणि कृषी क्षेत्रात डॉ.पंजाबराव देशमुखांचे मोठं योगदान



भारताचे पहिले कृषीमंत्री डॉ. पंजाबराव देशमुख यांची आज (२७ डिसेंबर) जयंती आहे. २७ डिसेंबर १८९८ रोजी अमरावती जिल्ह्यातील पापड गावात शेतकरी कुटुंबात त्यांचा जन्म झाला होता. कृषी आणि शैक्षणिक क्षेत्रात पंजाबराव देशमुख यांचं मोठं कार्य आहे. महाविद्यालये, अभियांत्रिकी पदवी, तसेच पदविका तंत्रनिकेतन, कृषी महाविद्यालय, वैद्यकीय महाविद्यालय अशी अनेक महाविद्यालये सुरू करुन शिक्षण क्षेत्रात त्यांनी मोठं योगदान दिलं.

**१९२० ला शिक्षणासाठी परदेशात**

पापड गावात तिसरीपर्यंत शाळा होती. नंतर चान्दुरातील शाळेतून पंजाबराव देशमुख यांनी चौथीचं शिक्षण घेतलं. पुढील शिक्षण कारंजा लाड येथे झाले. असे अनेक अडचणींना तोंड देऊन १९१८ ला ते दहावी उच्च श्रेणीत पास झाले. १९१८ साली २५ जूनला त्यांनी पुण्याच्या फर्ग्युसन कॉलेजमध्ये प्रवेश घेतला. तेथील शिक्षण पूर्ण झाल्यानंतर पुढील शिक्षणासाठी आपल्याला इंग्लंडला जायचे असे त्यांनी मनाशी पक्के ठरवले होते. इंग्रजीतून भाषण व लेखन करण्यासाठी त्यांनी अभ्यास केला. परदेशात शिक्षण करण्यासाठी पैशांची गरज होती. यावेळी पैशासाठी पंजाबरावांचे वडील शामराव यांनी त्यांची संपूर्ण शेती गहाण टाकून पैसा उभा केला. २१ ऑगस्ट १९२० रोजी पंजाबराव देशमुख बोटीने इंग्लंडला पोचले. अत्यंत खडतर जीवन जगत पंजाबरावांनी अभ्यास करुन उच्च शिक्षण पूर्ण केलं. १९२६ मध्ये ते भारतात परत आले.

**१९३१ मध्ये श्री शिवाजी शिक्षण संस्थेची स्थापना**

पंजाबराव देशमुख हे स्वतंत्र भारतात ते भारताचे कृषीमंत्री होते. विदर्भात शिक्षणाचा प्रसार व्हावा म्हणून त्यांनी १९३१ मध्ये श्री शिवाजी शिक्षण संस्था काढली. या संस्थेच्या पश्चिम विदर्भात म्हणजे अमरावती विभागात अंदाजे एक हजाराच्या वर शाळा आहेत. महाविद्यालये, अभियांत्रिकी पदवी, तसेच पदविका तंत्रनिकेतन, कृषी महाविद्यालय, वैद्यकीय महाविद्यालय अशी अनेक महाविद्यालये सुरू करून त्या संस्था शिक्षण क्षेत्रात फार मोठे योगदान देत आहेत. राष्ट्रपती डॉ. राजेंद्र प्रसाद यांनी १९५० मध्ये सार्वजनिक विद्यापीठाची स्थापना केली. त्याच वर्षी पंजाबराव देशमुखांनी सात महाविद्यालये स्थापन केली आणि अमेरिकेत स्थलांतरित झाले.


**भारताच्या कृषी क्रांतीचे प्रणेते**

शेतकरी नेते अनेक आहेत, पण शेतकऱ्याचे अश्रू पुसणारे आणि त्याची व्यथा समजून घेणारे मोजकेच आहेत. पंजाबराव देशमुख हे शोषितांचे, शेतकऱ्यांचे तारणहार होते. ते १९५२ ते १९६२ या काळात भारताचे कृषी मंत्री होते. त्यांनी या काळात कृषी आणि शेतकऱ्यांसाठी क्रांतिकारी काम केलं. पंजाबी शेतकरी भाऊसाहेबांचा उल्लेख मपंजाबराव पंजाबफ असा करू लागले. त्यांनी १९५५ मध्ये मभारत कृषक समाजफ ची स्थापना केली. डॉ. राजेंद्र प्रसाद, पंडित जवाहरलाल नेहरू आणि इतरांनी १९५९ मध्ये दिल्लीत मजागतिक कृषी प्रदर्शनाफ ला हजेरी लावली. ते राष्ट्रीय कृषीसह अनेक संस्थांचे संस्थापक आणि अध्यक्ष होते.

**पंजाबराव देशमुखांचे कार्य**

**१) १९२७ – शेतकरी संघाच्या प्रचारासाठी 'महाराष्ट्र केसरी' हे वर्तमानपत्र चालवले.**
**२) वैदिक वाययातील धर्माचा उद्गम आणि विकासफया प्रबंधाबद्दल डॉक्टरेट.**
**३) १९३३ – शेतकऱ्यांची कर्जातून मुक्तता करणारा कर्ज लवाद कायदा पारीत करण्यात मोठा वाटा आहे. त्यामुळं त्यांना हिंदुस्थानच्या कृषक क्रांतीचे जनक म्हणतात.**
**४) १९२६ – मुष्टिफंड या माध्यमातून गरीब होतकरू विद्यार्थ्यांसाठी श्रद्धानंद छात्रालय काढले.**
**५) १९२७ – शेतकरी संघाची स्थापना.**
**६) १९३२ – ए. डब्ल्यू. पाटील यांच्या सहकार्याने श्री शिवाजी शिक्षण संस्थेची स्थापना.**
**७) – ग्रामोद्धार मंडळाची स्थापना.**
**८) १९५० – लोकविद्यापीठाची स्थापना (पुणे), त्याचे नंतर यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठात रूपांतर झाले.**
**९) १९५५ – भारत कृषक समाजाची स्थापना, त्याच्याच विद्यमाने राष्ट्रीय कृषी सहकारी खरेदी विक्री संघाची स्थापना.**
**१०) १६५६ – अखिल भारतीय दलित संघाची स्थापना.**
**११) १८ ऑगस्ट १९२८ – अमरावती अंबाबाई मंदिर अस्पृश्यांसाठी खुले व्हावे म्हणून सत्याग्रह .**
**१२) १९३० – प्रांतिक कायदे मंडळावर निवड. शिक्षण, कृषी, सहकार खात्याचे मंत्री**
**१३) १९५२, १६५७, १९६२ असे तीन वेळा लोकसभेवर निवडून गेले.**
**१४) १९५२ ते १९६२ केंद्रीय मंत्रिमंडळात कृषिमंत्री. भारताचे पहिले कृषिमंत्री.**
**१५) देवस्थानची संपत्ती सरकारने ताब्यात घेऊन विधायक कार्य करावे या उद्देशाने १९३२ मध्ये हिंदू देवस्थान संपत्ती बिल मांडले.**
**१६) प्राथमिक शिक्षकांच्या समस्या सोडवण्यासाठी प्राथमिक शिक्षक संघाची स्थापना.**
**१७) १९६० – दिल्ली येथे जागतिक कृषी प्रदर्शन भरवले.**

## स्वयंचलित शवदाहिनी यंत्राचे ऑनलाईन लोकार्पण



**गोंदिया :** समता, स्वातंत्र्य व न्याय या विचारांचे पालन करुन सर्व नागरिकांनी अहिंसेच्या मार्गाने वाटचाल करावी, असे प्रतिपादन अन्न व औषध प्रशासन मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री धर्मरावबाबा आत्राम यांनी येथे केले.

गोंदिया येथील नेहरु चौकात अहिंसा द्वारचे भूमीपुजन करतांना श्री. आत्राम बोलत होते. आमदार सर्वश्री विनोद अग्रवाल, मनोहर चंद्रिकापुरे, जि.प.उपाध्यक्ष यशवंत गणवीर, माजी आमदार राजेंद्र जैन, जिल्हाधिकारी चिन्मय गोतमारे, न.प.चे मुख्याधिकारी करणकुमार चव्हाण यांची यावेळी प्रामुख्याने उपस्थिती होती.प्रारंभी पालकमंत्री धर्मरावबाबा आत्राम यांच्या हस्ते गोंदिया येथील नेहरु चौकात नियोजित जागी कुदळ मारुन विधीवत अहिंसा द्वारचे भूमीपुजन करण्यात आले.पालकमंत्री श्री. आत्राम म्हणाले, नगर विकास विभागाद्वारे नगर परिषद निधी अंतर्गत ३० लक्ष रुपये खर्च करुन गोंदिया येथील नेहरु चौकात सुंदर असा अहिंसा प्रवेशद्वार तयार करण्यात येत आहे.

सदर द्वार हा लोकांना शांती व अहिंसेची प्रेरणा देणारा प्रवेशद्वार असणार आहे. जैन धर्माने अहिंसा, शांती व सत्याचा संदेश दिलेला आहे, त्यांचे विचार आचरणात आणावे असे त्यांनी सांगितले. यावेळी आमदार विनोद अग्रवाल, माजी आमदार राजेंद जैन व जिल्हाधिकारी चिन्मय गोतमारे यांनीही आपले विचार व्यक्त कले.

गोंदिया शहर वासियांची बऱ्याच दिवसापासून स्वयंचलित शवदाहिनी यंत्राची मागणी होती. सदर मागणीची नगर परिषद गोंदिया द्वारे १ कोटी १५ लाख रुपये खर्च करुन पुर्तता करण्यात आली असून आज नेहरु चौकात पालकमंर्त्यांच्या हस्ते फित कापुन स्वयंचलित शवदाहिनी यंत्राचे ऑनलाईन लोकार्पण करण्यात आले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक न.प.चे मुख्याधिकारी करणकुमार चव्हाण यांनी केले. सुत्रसंचालन न.प. प्रशासन अधिकारी शिक्षण रविंद्रकुमार अंबुले यांनी केले तर उपस्थितांचे आभार न.प. प्रशासकीय अधिकारी चुन्नीलाल राणे यांनी मानले. कार्यक्रमास संजय जैन, निखिल जैन, माधुरी नासरे, कुंदा दोनोडे, अशोक शहारे, जैन धर्माचे पदाधिकारी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### जनता दरबारात पालकमंत्र्यांनी ऐकल्या नागरिकांच्या समस्या

**गोंदिया :** अन्न व औषध प्रशासन मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री धर्मरावबाबा आत्राम यांनी तहसिल कार्यालय आमगाव येथे आयोजित जनता दरबारात जनतेच्या तक्रारी व समस्या जाणून घेतल्या व प्रशासनाला नागरिकांच्या समस्या व तक्रारींचे तातडीने निराकरण करण्याचे निर्देश दिले. जनता दरबारात प्राप्त तक्रारी व समस्या सोडविण्यासाठी संबंधीत विभागाने चौकशी करुन कालबध्द कार्यक्रम तयार करुन प्रकरणे निकाली काढावे असे त्यांनी सांगितले. जिल्हाधिकारी चिन्मय गोतमारे, जि.प.चे मुख्य कार्यकारी अधिकारी अनिल पाटील, पोलीस अधीक्षक निखिल पिंगळे, माजी आमदार राजेंद्र जैन, उपविभागीय अधिकारी सत्यम गांधी, आदिवासी विकास प्रकल्प अधिकारी विकास राचेलवार यांची प्रामुख्याने उपस्थिती होती.यावेळी मनरेगाची कामे, योजनांचा लाभ, आरोग्य सेवा बळकटीकरण, समाज मंदिर बांधकाम, लोक-कलाकारांना मानधन, जि.प.प्राथमिक शाळा माल्ही येथे शौचालय बांधकाम, चिरचाळबांध परिसरातील ब्लास्टींग व डांबर प्लांटमुळे नागरिकांना धोका असल्यामुळे सदर काम बंद करण्यात यावे यावर चर्चा करण्यात आली.

## विदर्भाच्या विकासावर आमदार अडबाले यांनी वेधले लक्ष




**गोंदिया :** नागपूर हिवाळी अधिवेशनात अंतिम आठवडा प्रस्तावावर बोलताना आमदार सुधाकर अडबाले यांनी विदर्भातील विविध प्रश्नांवर चर्चा केली. वन्यप्राण्यांचा धोका, दुष्काळी परिस्थिती, उद्योगामुळे होत असलेले प्रदूषण, बेरोजगारी आणि सैनिकी शाळेमध्ये विदर्भातील विद्यार्थ्यांना आरक्षण देण्याची मागणी यावेळी त्यांनी सभागृहात केली.

आमदार अडबाले म्हणाले की, चंद्रपूर आणि गडचिरोली जिल्ह्यामध्ये वन्यप्राण्यांचा धोका मोठ्या प्रमाणात वाढला आहे. शेतकरी व शेतमजुरांचा वन्यप्राण्यांमुळे बळी जात आहे. गडचिरोली जिल्ह्यामध्ये हत्तींचा हैदोस सुरू आहे. जंगली प्राण्यांमुळे पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत आहे. शेतकऱ्यांना सौर ऊर्जा पंप पुरेशा प्रमाणात देण्याची गरज आहे. जंगली प्राण्यांमुळे शेतीचे नुकसान होत असेल तर पिक कव्हर इन्शुरन्स देण्याची व्यवस्था करावी.

विदर्भामध्ये विशेष करून चंद्रपूर जिल्ह्यामध्ये सिमेंट उद्योग मोठ्या प्रमाणात आहे. या उद्योगांमुळे प्रदूषण होत आहे. प्रदूषणामुळे पिकांचे आणि नागरिकांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होत आहे. अनेक आजारांनी चंद्रपुरकरांना ग्रासले आहे. गडचिरोली जिल्ह्यातील सूरजागड या ठिकाणी खनिज संपत्ती मोठ्या प्रमाणात आहे. या ठिकाणीही प्रदूषण मोठ्या प्रमाणात वाढले आहे. चंद्रपूर जिल्ह्यामध्ये मोठ्या प्रमाणात कोळसा खाणी असल्यामुळे जलसाठा खोली वाढली आहे. विहिरी किंवा बोरिंगचे पाणी खोलवर गेले आहे. वर्धा नदीवर शेतकऱ्यांच्या सिंचन दृष्टीने बॅरेजेस बांधण्याची गरज आहे.

विदर्भात बेरोजगारी मोठ्या प्रमाणात वाढली आहे. सुशिक्षित बेरोजगार पुणे-मुंबईला जातात. विदर्भातील उद्योगांना प्रोत्साहन देण्याची गरज आहे. कापूस आणि सोयाबीन हे विदर्भाचे मुख्य पीक आहेत. या पिकांच्या भावात स्थिरता आणण्याची गरज आहे.

गडचिरोली जिल्ह्यामध्ये रेल्वे नाही. रेल्वे कशी पोहोचेल, यादृष्टीने शासनाने पाऊले उचलावीत. चंद्रपूर जिल्ह्यात असलेल्या सैनिकी शाळेमध्ये विदर्भातील विद्यार्थ्यांना प्रवेश घेण्यासाठी विशेष आरक्षण द्यावे. जेणेकरुन होतकरू विद्यार्थ्यांना उत्तम दर्जाचे शिक्षण घेता येईल व इतर विदर्भ विकासाच्या बाबींकडे आमदार सुधाकर अडबाले यांनी लक्ष वेधले.

## महाराष्ट्र आफिसर्स फोरमच्या अध्यक्षपदी आ.चंद्रिकापूरे



**गोंदिया:** महाराष्ट्र आफिसर्स फोरमची सभा नुकतीच बानाई येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर सांस्कृतिक सभागृहात पार पडली. सभेच्या अध्यक्षस्थानी सुधीर शंभरकर होते. यावेळी शंभरकर यांनी राज्यस्तरीय कार्यकारिणीच्या निवडणूकीची प्रक्रिया, निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून पार पाडली.यात स्थानिक आमदार मनोहर चंद्रीकापूरे यांची अध्यक्षपदी तर सचिवपदी इंजि. सच्चिदानंद दारूंडे यांची निवड झाली.

तत्पुर्वी सभेत विविध दहा विषयांवर चर्चा झाली. दरम्यान मे २०२२ मध्ये गठीत राज्यस्तरीय कार्यकारिणी बरखास्त करून नवीन कार्यकारिणीचे सर्वानुमते गठण करण्यात आले. अर्जुनी मोरचे आमदार मनोहर चंद्रिकापूरे यांची अध्यक्षपदी तर इंजी. सच्चिदानंद दारूंडे यांची सचिवपदी निवड करण्यात आली. उपाध्यक्ष म्हणून डॉ. पंजाबराव मूल, अनिल फुलझेले, सहसचिव डॉ. विद्या मानकर, कोषाध्यक्ष दिगांबर गोंडाणे, सदस्यपदी मिलिंद बनसोड, डॉ. प्रशांत गेडाम, किशोर सुरडकर, केतन सोनपिपरे यांची निवड करण्यात आली.

## दिव्यांग बंधूंच्या कल्याणाकरिता सदैव तत्पर - आ.विजय रहांगडाले

**तिरोडा:**–अपंग लोक म्हणजे असे लोक असतात ज्यांना मानसिक किंवा शारीरिक मर्यादा असतात म्हणून ते त्यांच्या दैनंदिन जीवनातील गरजा आणि नोक?्या करण्यासाठी त्यांना आधार देण्यासाठी कोणावर तरी अवलंबून असतात. बहुतेक अपंगांना ऑर्थोपेडिक अपंगत्व म्हणून परिभाषित केले जाते, म्हणजे, शरीर आणि त्याची कार्ये यांचा समावेश असलेले अपंगत्व. मात्र, त्याला ङ्गकॉग्निटिव्ह डिसॅबिलिटीफ असेही म्हणतात अशा दिव्यांग बंधूच्या समस्या सोडविण्याकरिता मी सदैव तत्पर आहे असे प्रतीपादन तिरोडा गोरेगाव विधानसभा क्षेत्राचे आमदार विजय रहांगडाले यांनी केले. भारताचे दिवंगत माजी पंतप्रधान भारतरत्न अटलबिहारी वाजपेई यांच्या जयंतीनिमित्त तिरोडा गोरेगाव विधानसभा क्षेत्रातील १८ वर्षावरील दिव्यांग बंधूकरिता बॅटरीचलित ट्रायसिकल वितरण करण्याकरिता मूल्यमापन शिबिराचे आयोजन तिरोडा गोरेगाव विधानसभा क्षेत्राचे आमदार विजय रहांगडाले यांच्या हस्ते करण्यात आले. या कार्यक्रमाला प्रामुख्याने जी.प.सदस्य तथा संगनियो अध्यक्ष चत्रभूज बिसेन, जी.प.सदस्या रजनी कुंभरे, ?ड.सौ.माधुरी रहांगडाले, तुमेश्वरी बघेले, किशोर महारवाडे, शैलेश नंदेश्वर, प.स.सभापती कुन्ता पटले, उपसभापती हुपराज जमाईवार, कृउबास सभापती जितेंद्र रहांगडाले,भाजप जिल्हा उपाध्यक्ष मदन पटले, विधानसभा प्रमुख वसंत भगत, भाजयुमो जिल्हाध्यक्ष ओम कटरे, मजूर सहकारी संस्था सचिव उमाकांत हारोडे, भाजप तालुकाध्यक्ष भाऊराव कठाणे, दलित आघाडी जिल्हाउपाध्यक्ष दिगम्बर ढोके, प.स.सदस्य सुनंदा पटले, चेतलाल भगत आदी उपस्थित होते.

## भ्रष्टाचार व शोषणाचे मूळ-निवडणूक प्रक्रियेत

निवडणूक आयोगाने उमेदवारांसाठी निर्धारित केलेल्या लेटेस्ट निवडणूक खर्च मर्यादा खालील प्रमाणे आहेत. ती मर्यादा राज्य निहाय, सदस्य संख्या निहाय वेगवेगळी आहे. इथे जास्तीत जास्त दिली आहे. खासदार ९५ लाख रु. आमदार ४० लाख रु. महानगरपालिका १० लाख रु. जिल्हा परिषद ६ लाख रु. पंचायत समिती ४ लाख रु. सरपंच १.७५ लाख रु. ग्रामपंचायत सदस्य पन्नास हजार रुपये. या खर्च मर्यादेत २०२२ ला भरमसाठ वाढ करण्यात आलेली होती. उदाहरणात पूर्वी खासदारांची ७० लाख रु. व आमदाराला २८ लाख रु. ही मर्यादा होती. या खर्चाच्या निधीमध्ये उमेदवारांनी व्यक्तिगत केलेला खर्च व त्या अधिकृत उमेदवाराला मदत म्हणून राजकीय पक्षांनी केलेला खर्च दोन्हीही अंतर्भूत आहेत. त्यावर देखरेख करण्यासाठी निवडणूक आयोगाने स्वतंत्रपणे वेब पोर्टल सुरू केले आहे. या निवडणूक खर्चाच्या मर्यादेमध्ये प्रचंड प्रमाणात घट करण्यात यावी. कारण निवडणूक हा फक्त पैसेवाल्यांचा खेळ झाला आहे. इतरांना त्यात भाग घेता येत नाही. थोडक्यात ही धनदांडग्यांची मक्तेदारी झाली असून लोकशाही प्रक्रियेतून सर्व सामान्य नागरिकांना वगळण्याचा प्रकार आहे. बरेचसे स्थानिक व नवीन मान्यता मिळालेल्या राजकीय पक्षांना एवढे पैसे खर्च करण्याचे ऐपत नसते. त्यामुळे सामना बरोबरीचा, समान संधीचा होणार नाही. शिवाय निवडणुकीत झालेला पैसा खर्च वसूल करण्यासाठी हे लोकप्रतिनिधी कितीतरी पटीने पैसा वसूल करून व पुढील निवडणुकीची तजवीज करण्यासाठी प्रचंड प्रमाणात भ्रष्टाचार करतात. निवडणूक पद्धती भ्रष्टाचाराचे एक महत्वाचे मूळ कारण आहे.

**✠गुन्हेगारांना बंदी:**

देशातील ५१७५ खासदार व आमदारांविरुद्ध खटले प्रलंबित आहेत. ४३ % खासदारांवर फौजदारी स्वरूपाचे गंभीर गुन्हे आहेत. राजकारणातील गुन्हेगारीकरण थांबवण्यासाठी दोषी नेत्यांना सहा वर्षाची निवडणूक बंदी घालण्यापेक्षा त्यांना आजीवन बंदी घालण्यात यावी. गुन्हेगारी प्रकरणात शिक्षा झालेल्या सरकारी कर्मचा?्यांना जसे बडतर्फ केले जाते. तोच नियम राजकारणी नेत्यांना लागू करावा.

**✠राजकीय पक्षांना मिळणाऱ्या देणग्यावर बंदी आणावी:**

देशात सेवाभावी वृत्तीने काम करणाऱ्या सामाजिक संस्थांचा सीएसआर फंड (कार्पोरेट सोशल रेस्पोंसिबीलीटी) अंतर्गत मिळणारा फायदा त्यांना न मिळता राजकीय पक्षच लाटत आहेत. पूर्वी Foreign Contribution Regulation Act (FCRA) प्रमाणे उमेदवार व पक्षाला परदेशी कंपनीकडून मदत घेता येत नव्हती. पण २०१८ ला बदल करून भारतातील परदेशी कंपन्यांना पक्षांना मदत करता येते. Finance Act २०१७ या बदलानुसार पक्षांना मिळणाऱ्या देणग्यासाठी, कंपनीच्या तीन वर्षाच्या एव्हरेज नफ्याच्या ७.५% ची मर्यादा हटवण्यात आली आहे.

आर्थिक वर्ष २०१६-१७ ते २०२१-२२ या कालावधीमध्ये पक्षांना १६,४३८ कोटी रुपयांच्या देणग्या मिळाल्या. भाजपाला जवळपास इतर सर्व पक्षांच्या एकत्रित देणगी पेक्षा तिपटी पेक्षा जास्त पैसे मिळाले.

विदेशी कंपन्यांनी देशातील राजकारणाला प्रभावित करू नये म्हणून परदेशी मदत पक्षाला देण्यासाठी प्रतिबंध घालावा.

देणग्या देणारे भांडवलदार आपले धोरण राबवतात. त्यांची नावे जाहीर करण्यात यावीत.

**✠निवडणूक रोखे (Electoral Bond) योजना रद्द करण्यात यावी:**

इन्कम टॅक्स रिटर्न मध्ये याचा उल्लेख करण्याची गरज नाही. काळा पैसा पांढरा करण्याची ही व्यवस्था आहे.

निवडणूक रोख्याच्या माध्यमातून भाजपने राजकीय भ्रष्टाचाराचे कायदेशीरकरण केले आहे. २०१९ च्या सार्वत्रिक लोकसभा निवडणुकीच्या वेळी इलेक्ट्रॉल बाँड्स द्वारे भाजपला एकूण जमा ६१२८ कोटी रुपये निधीपैकी ९४.५ टक्के इतक्या प्रचंड देणग्या मिळाल्या होत्या. देणगीदार आणि लाभार्थी राजकीय पक्ष यापैकी कोणावरही या व्यवहाराचा तपशील जाहीर करण्याचे कायदेशीर बंधन नाही. यामध्ये अस्पष्टता व अपारदर्शकता हे अंतर्भूत दुर्गुण आहेत.

✠सध्या लष्करी, केंद्रीय आणि राज्य सशस्त्र पोलीस दलातील, तसेच परदेशातील अधिकारी यांना दुरुस्थ पद्धतीने मतदान (Electronically Transmitted Postal Ballet System) करण्याची सुविधा दिली आहे. त्याच धर्तीवर ग्रामीण भागातील लोक जे शहरांमध्ये स्थलांतरित झाले आहेत (NRR- Non Resident Rural) ह्यांना मतदान करता यावे.

साधारण ३० कोटी स्थलांतरीत नागरिकांना मतदान करण्यासाठी गावाकडे जाता येत नाही कारण प्रवास खर्चिक, वेळ व रजा नसते. त्यांच्यासाठी पण ही सुविधा देण्यात यावी. किंवा त्यांच्या साठी ङ्गआरव्हीएमङ्ग म्हणजे ङ्गरिमोट व्होटिंग मशिनङ्ग प्रणाली विकसित करण्यात यावी.त्यामुळे ग्रामीण भागाचा निवडणूक प्रक्रियेमध्ये निर्णयात्मक सहभाग वाढेल.

✠खर्च दाखवतात त्यापेक्षा कितीतरी पटीने जास्त केला जातो. त्याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले जाते. गाड्या भरभरून नोटा पकडल्या जातात. पण त्यानंतर कुठल्याही कार्यवाहीची बातमी येत नाही.

✠निवडणुकीचा खर्च हा ऑनलाइन पद्धतीने करण्यासाठी बंधनकारक करावे. उदाहरणार्थ चेक/ डीडी/आरटीजी/ गुगल पे वगैरे. म्हणजे काळ्या पैशाच्या व्यवहाराला आळा बसेल.

✠मतदारसंघाची पुनर्रचना करावी जेणेकरून शहरी व ग्रामीण भागाचे संतुलन राहील व लोकप्रतिनिधी निवड प्रक्रियेमध्ये ग्रामीण मतांचे महत्त्व वाढेल.

✠राज्यघटनेच्या ३२५ व्या कलमानुसार निवडणूक आयोगाच्या तीन सदस्याच्या निपक्षपाती नेमणुकीमध्ये स्वायत्तता बहाल केली होती. परंतु मुख्य निवडणूक आयोगाच्या नियुक्तीच्या प्रक्रियेतून सरन्यायाधीशांना हटवण्यात आले आहे. व आता त्या ऐवजी पंतप्रधान नेमतील त्या कॅबिनेट मंर्त्यांना अधिकार देऊन स्वायत्तता संपुष्टात आणली आहे. हे पुन्हा बदलण्यात यावे.

✠आचार संहितेचा भंग केल्यामुळे कोणी सी - व्हिजिल (cVigil) मोबाईल ॲपवर तक्रार केली तर उमेदवारावर कठोर कारवाई करण्यात यावी.

✠मतदारसंघाच्या एकूण मतदार संख्येमध्ये खूपच तफावत आहे, ती दूर करण्यात यावी. उदाहरणार्थ मुंबई दक्षिण मध्य लोकसभा मतदारसंघांमध्ये १४,४०,१४२ मतदार आहेत. तर ठाणे मतदारसंघात २३,७०,२७३ आहेत. एवढी प्रचंड तफावत आहे.

✠एका उमेदवाराला फक्त एकाच ठिकाणावरुन निवडणूक लढवायची परवानगी असावी. कारण तो दोन्ही ठिकाणावर निवडून आल्यास एका जागेसाठी पुन्हा पोटनिवडणुकीचा भुर्दंड करदात्यावर पडतो.

✠सध्या दोन्ही सभागृहात २६९ खासदारांकडे १० कोटी रु पेक्षा जास्त संपत्ती आहे. डॉ. बी पार्थ साराथी रेड्डी ह्यांच्या कडे तर ५३०० कोटी रु ची संपत्ती आहे. उमेदवारीसाठी संपत्तीची मर्यादा घालण्यात यावी.

वरील सुधारणा लोकप्रतिनिधी निवडणूक कायदा १९५१ व निवडणूक मार्गदर्शक नियम २०१४ मध्ये बदल करून निर्गमित करण्यात यावा.

शेतकरी व ग्रामीण मतदारांना आवाहन की त्यांनी मतदार यादी मध्ये जास्तीत जास्त नाव नोंदणी करून, मोठया प्रमाणामध्ये मतदानाचा हक्क बजवावा.

**- सतीश देशमुख,**
पुणे अध्यक्ष, फोरम ऑफ इंटलेकच्युअल्स ९८८१४९५५१८

स्वामीत्व, मुद्रक, प्रकाशक व संपादक खेमेंद्र हिरदीलाल कटरे यांनी बेरार टाईम्स हे साप्ताहिक वृत्तपत्र अंगपाल पारधी, लोकजन प्रकाशन, लोकजन भवन, स्नेह नगर, तकिया वॉर्ड, भंडारा ता.जि.भंडारा येथे मुद्रीत करुन डोलारे एजन्सीसमोरील रस्ता,शिवनगर गोंदिया येथे प्रकाशित केले. संपादक खेमेंद्र हिरदीलाल कटरे, भ्रमणध्वनी क्र. ८०८०८१५३२९ (पी.आर.बी. कायद्यानुसार जबाबदारी संपादकावर राहील) प्रसिद्ध झालेल्या मजकुराशी संपादक व प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. (गोंदिया न्यायकक्षेत)

साप्ताहिक बेरार टाईम्स निर्भिड, निष्पक्ष लोकप्रिय साप्ताहिक http://berartimes.com बुधवार, दि.२७ डिसेंबर २०२३ 

# नोंदणी की विक्री करणाऱ्या शेतकऱ्यांना बोनस

## शेतकरी संभ्रमात: फेडरेशन म्हणते अजून गाईड लाईन नाही, प्रतीक्षा करा



**गोंदिया:** मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी नागपूर येथील हिवाळी अधिवेशनादरम्यान धानाला प्रति हेक्टर २० हजार रुपये बोनस दोन हेक्टरपर्यंत जाहीर केला. पण याचा लाभ शासनाच्या एनईएमएल या पोर्टलवर ऑनलाईन नोंदणी केलेल्या की शासकीय धान खरेदी केंद्रावर धानाची विक्री करणाऱ्या शेतकऱ्यांना मिळणार, हे अद्याप स्पष्ट झाले नाही. त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये संभ्रमाचे वातावरण आहे.

धान उत्पादक शेतकऱ्यांना शासनाकडून दरवर्षी बोनस जाहीर केला जातो. सन २०२१ पर्यंत शासनाकडून धानाला प्रति क्विंटलप्रमाणे बोनस जाहीर केला जात होता. पण मागील वर्षीप-ासून शासनाने प्रति हेक्टर बोनस जाहीर करण्यास सुरुवात केली. मागील वर्षी शासनाने शासनाच्या ऑनलाईन पोर्टलवर नोंदणी केलेल्या शेतकऱ्यांना बोनसचा लाभ दिला होता. तर यासाठी शासकीय धान खरेदी केंद्रावर धान विक्री केला तरच बोनस मिळेल,असे सांगितले नव्हते.

मात्र यंदा यासंदर्भात अद्यापही कुठलेही आदेश आले नाही. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सभागृहात बोनसची घोषणा केली. पण त्यासंदर्भातील गाईड लाईन अद्यापही जिल्हा मार्केटिंग फेडरेशन आणि आदिवासी विकास महामंडळाला प्राप्त झालेली नाही. त्यामुळे मागील वर्षीप्रमाणेच ऑनलाईन नोंदणी करणाऱ्या शेतकऱ्यांना बोनसचा लाभ मिळेल, असे सांगितले जात आहे. पण यासंदर्भात अधिकृत कुठलीच माहिती नसल्याने धान उत्पादक शेतकऱ्यांमध्ये संभ्रमाचे वातावरण आहे.

### निकषात बदल केल्यास अनेक शेतकरी मुकणार

**यंदा शासकीय धान खरेदी केंद्र सुरु होण्यास तब्बल महिनाभर उशीर झाला. तर हमीभावापेक्षा खासगी व्यापारी धानाला अधिक दर देत होते. त्यामुळे जिल्ह्यातील अनेक शेतकऱ्यांनी धानाची खासगी व्यापाऱ्यांना विक्री केली. मात्र त्यानंतर आता शासनाने धानाला हेक्टरी २० हजार बोनस जाहीर केला. याचा लाभ दोन हेक्टरपर्यंत देण्यात येणार आहे. यासाठी हमीभाव केंद्रावर धानाची विक्री करणे अनिवार्य असल्याची अट टाकल्यास जिल्ह्यातील अनेक शेतकरी बोनसला मुकण्याची शक्यता आहे.**

### आठ दिवसात येणार गाईड लाईन

**धानाला बोनसची घोषणा झाल्यानंतर त्यासंदर्भातील गाईट लाईन अद्याप जाहीर करण्यात आली नाही. येत्या आठ दिवसात या गाईड लाईन विभागाला मिळणार असल्याचे जिल्हा मार्केटिंग फेडरेशनच्य अधिकाऱ्यांनी सांगितले.**

# बांधकाम विभागाचे विश्रामगृह झाले कबाड गोदाम

## प्रशासनाच्या उदासीनतेमुळे गोरेगावच्या विश्रामगृहाचे बेहाल

**गोंदिया:** सार्वजनिक बांधकाम विभागाचे उपविभागीय अभियंत्यांच्या उदासीनतेमुळे गोरेगावच्या शासकीय विश्रामगृहाचे रद्दीगृहात रुपांतर झाले आहे. गेल्या अनेक वर्षांपासून विश्रामगृहाचा वापर होत नसल्यामुळे लाखोंची मालमत्ता बेवारस पडून आहे. हे विश्रामगृह सुरु करण्याकडे वरील विभागाने गांभीर्याने लक्ष दिल्यास विश्रामगृह सुरु झाल्यानंतर शासनाला महसूल मिळू शकेल. मात्र याकडे गांभीर्याने घेण्याऐवजी बांधकाम विभाग दुर्लक्ष करीत आहे.

प्रत्येक तालुक्यात शासकीय विश्रामगृहे आहेत. जिल्ह्यात कोणताही अधिकारी, पाहुणे, लोकप्रतिनिधी, पर्यटक आल्यास त्यांची राहण्याची व भोजनाची व्यवस्था शासकीय विश्रामगृहात करता येईल, हा त्याचा मुख्य उद्देश आहे. परंतु जिल्ह्यातील काही विश्रामगृहे वगळता अन्य विश्रामगृहे धुळखात पडली आहेत. गोरेगाव तहसील मुख्यालयात सार्वजनिक बांधकाम विभागाचे उपविभागीय अभियंत्यांच्या नियंत्रणाखाली नैसर्गिक वातावरणात विश्रामगृह बांधले आहे. मात्र, विश्रामगृहाचा वापर गेल्या अनेक वर्षांपासून बंद आहे. त्यामुळे विश्रामगृहाचे रद्दीगृहात रुपांतर झाले आहे. लाखोंच्या शासकीय मालमत्तेचे नुकसान होत आहे. विश्रामगृहे बंद असल्याने शासनाचा महसूलही मोठ्या प्रमाणात बुडत आहे. या सर्व प्रकाराला सार्वजनिक बांधकाम विभागाच जवाबदार आहे.



### महसूलाचेही नुकसान

**गोरेगाव हे तालुका मुख्यालय असल्याने नागझिरा व्याघ्र प्रकल्प, चुलबंद जलाशय, मांडोदेवी तीर्थक्षेत्र इत्यादी पर्यटनस्थळे या मुख्यालयाला लागून आहेत. ही स्थळे पाहण्यासाठी दुरदुरवरुन पर्यटक येतात. मात्र, निवास व भोजनाची पुरेशी सुविधा नसल्याने पर्यटकांना गोंदिया मुख्यालयाकडे वळावे लागत आहे. हे विश्रामगृह सुरु झाल्यास प्रशास-नाला दरवर्षी लाखोंचा महसूल मिळू शकेल. विभागाला विश्रामगृह चालवण्यास स्वारस्य नसेल तर ते खासगी संस्थांना निविदा प्रक्रियेद्वारे चालविण्यास द्यावे, अशी सुचनाही नागरिकांकडून केली जात आहे. त्यामुळे शासनाच्या लाखो रुपयांच्या मालमत्तेचे रक्षण होणार असून स्थानिक बेरोजगार संस्थांनाही लाखो रुपयांचा महसूल मिळून रोजगार उपलब्ध होणार आहे.**

# जल व्यवस्थापनासाठी पाणी मीटरची नितांत गरज-इंजि कटरे



**तिरोडा:-** जलव्यवस्थापनासाठी आता पाणी मोजमाप यंत्र अर्थात मीटरची नितांत गरज आहे, त्यामुळेच पाण्याची बचतही होईल असे प्रतिपादन सेवानिवृत्त कार्यकारी अभियंता संजय कटरे यांनी केले.

तिरोडा, येथे आयोजित ३ दिवशीय प्रशिक्षणाचा समारोप थाटात झाला. या प्रसंगी श्री कटरे यांनी प्रवीण प्रशिक्षक म्हणून मार्गदर्शन केले.जल जीवन मिशन अंतर्गत हे प्रशिक्षण आयोजित करण्यात आले होते.दरम्यान तालुक्यातील बोदलकसा येथेही आयोजित प्रशिक्षण कार्यक्रमात सेवानिवृत्त गट विकास अधिकारी एन. आर. जमईवार यांनीही प्रवीण प्रशिक्षक म्हणून मार्गदर्शन केले.

गोंदिया जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अनिल पाटील, उपमुख्य कार्यकारी अधिकारी जी. आर. खामकर यांच्या मार्गदर्शनात , आणि नागपूरच्या पंचायत राज प्रशिक्षण केंद्राचे प्राचार्य अभय बनसोड यांच्या नियंत्रणात आयोजित या प्रशिक्षणाची प्रशिक्षणार्थ्यांनी तोंड भरुन प्रशंसा केली. प्राईमूव्ह संस्थेचे पर्यवेक्षक डॉ ए. सी. मुजावर यांच्या सुपरविजनमध्ये तिरोडा आणि बोदलकसाचे प्रशिक्षण झाल्यामुळे प्रशिक्षणार्थ्यांना पाण्याचे गांभीर्य चांगलेच कळले.

तिरोडा येथे प्रवीण प्रशिक्षक संतोष परमार, पृथ्वीराज कोल्हटकर यांनी तर बोदलकसा येथे सेवा निवृत्त विस्तार अधिकारी श्री भुरे यांनी प्रशिक्षण दिले.इंदोरा खुर्द येथे प्रक्षेत्र भेट देऊन जलव्यवस्थापणाची प्रात्यक्षिक माहिती प्रशिक्षणार्थ्यांना देण्यात आली.शासकीय योजनांचे अभिषरण, निधी कसा मिळविता येईल, नेतृत्व विकास कसा अस-ावा आदि विषयांचा आजच्या प्रशिक्षणात समावेश करण्यात आला. दरम्यान प्रशिक्षणार्थ्यांना प्रमापत्राचे वाटप करून कार्यक्रमाची सांगता झाली.यावेळी अर्जुनी /मोर पंचायत समितीचे विस्तार अधिकारी श्री राणे उपस्थित होते. समन्वयक मुकुंद गजभिये आणि श्री लोखंडे यांनी सहकार्य केलं.तालुक्यातील २० ग्राम पंचायतीचे सरपंच ग्रामसेवक, महिला बचत गटाचे, प्रतिनिधी, जलसूरक्षक आदींनी लाभ घेतला.

## क्रीडा महोत्सवामुळे विद्यार्थ्यांतील कौशल्य व सुप्त गुणांना वाव-माजी आ.राजेंद्र जैन

**गोंदिया:** अटल क्रीडा व सांस्कृतिक महोत्सव पुरस्कार वितरण सोहळाचे शानदार आयोजन प्रसंगी भारतरत्न माजी प्रधानमंत्री अटल बिहारी वाजपेयीजी यांना जयंती निमित्त विनम्र अभिवादन करीत माजी आमदार श्री राजेन्द्र जैन म्हणाले की, विद्यार्थी अवस्था हि परिवर्तनशील असून त्यांच्या कलागुणांना जेवढी योग्य संधी मिळेल तेवढीच त्यांची प्रखरतेने व उत्कृष्टपणे जडण घडण होत असते. विद्यार्थ्यांच्या सांस्कृतिक तसेच शारीरिक खेळांतील कौशल्यांचा व सुप्त गुणांना वाव मिळावा व शैक्षणिक प्रगती सोबतच त्यांचा सर्वांगीण विकास व्हावा म्हणून शाळांच्या विद्यार्थ्यांना खेळ व सांस्कृतिक मंच उपलब्ध करून देण्याचे उत्कृष्ट कार्य जिल्हा परिषद अध्यक्ष पंकज रहांगडाले व त्याच्या सहकाऱ्यांनी केले आहे. यामुळे अनेक प्रतिभावान विद्यार्थी बाहेर येतील आणि विविध स्तरावर नावलौकिक करतील असे प्रतिपादन माजी आमदार श्री राजेंद्र जैन यांनी केले.

## नूतन वर्षे महिलांसाठी सर्वात जास्त आनंदायी येणार-ना.आदीतीताई तटकरे




**गोंदिया:-** जिल्ह्यातील सर्वसामान्य जनतेचे आरोग्य निरोगी राहावे यासाठी शासन विविध स्तरांवर प्रयत्नशील आहे. येणारे नुतन वर्षी महाराष्ट्र शास-नाने महिलांसाठी विविध योजना आणण्यासाठी कटिबद्ध असल्याने येणारे वर्षे महिलांसाठी अधिक आनंददायी ठरणार असल्याचे प्रतिपादन महिला व बालकल्याण मंत्री ना.आदिती सुनिल तटकरे यांनी गोंदिया येथे आयोजित कार्यकर्ता भेट कार्यक्रमात केले.

एन.एम.डी महाविद्यालय सभागृहात महिला व बालकल्याण अधिकारी, बचत महिला पदाधिकारी, महिला व राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे कार्यकर्ते यांचे भेट कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी ना.आदिती सुनिल तटकरे, प्रमुख अतिथी माजी आमदार राजेंद्र जैन, गंगाधर परशुरामकर, प्रेमकुमार रहांगडाले, राजलक्ष्मी तुरकर, निखिल जैन, पुजा अखिलेश सेठ, सुरेश हर्षे, केतन तुरकर, आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी ना.आदितीताई तटकरे यांना गोंदिया शिक्षण संस्था द्वारे स्मृती चिन्ह देवून गौरविण्यात आले.माजी आमदार राजेंद्र जैन यांनी मार्गदर्शन करताना महायुतीचा कार्यप्रणाली व महिलांसाठी राबविण्यात येणाऱ्या विविध योजना विषयी सविस्तर माहिती सांगितली.ना.आदितीताई तटकरे पुढे म्हणाल्या की, आज महिला हे राजकीय नेतृत्व ठरवित आहेत. त्यांची भुमिका अतिशय महत्त्वाची आहे. महिला राजकीय परिवर्तन घडवून आणण्यासाठी महत्वाची भुमिका वठवित आहे. शासनाच्या विविध योजना ह्या महिलांसाठी विकासाची पर्वणी आहे. अंगणवाडी सेविका यांच्या समस्या लवकरच सोडविण्यासाठी प्रयत्न केले जात आहे. प्रास्ताविक भाषणातून राष्ट्रवादी काँग्रेस महिला शहर अध्यक्ष डॉ.माधूरी नासरे यांनी महिलांच्या समस्या व अंगणवाडी सेविका यांचे महत्वाचे योगदान सांगितले.

त्यानंतर माझी कन्या भाग्यश्री योजना अंतर्गत गुंतवणूक प्रमाणपत्र रापेवाडा येथील कु.काव्या सतीश येडे, नंगपुरा मुर्री चे खुशबू ओंमेद्र रहांगडाले, कायरा ओंमेद्र रहांगडाले, कांरजा चे कु.आरोही सुमित डोंगरे, कु.अमिराह अब्दुल शुभेदार, तुमखेडा चे कु.हिना सुरेंद्र मंडिया लाभार्थी यांना पंचवीस हजार रुपयेचे बालविकास प्रकल्प अधिकारी प्रकल्प २ अंर्तगत गुंतवणूक प्रमाणपत्र, एफ.डी ना.आदिती तटकरे यांच्या हस्ते देण्यात आले.


## ग्राम पंचायत कार्यालय वडेगाव/बंध्या,पंचायत समिती अर्जुनी/मोर.जि.गोंदिया

क./ग्रापसि/निविदा/ ५०/२०२३ दिनांक - २७/१२/२०२३

**निविदा सूचना क्र.-१(पहिली वेळ) सन २०२३-२४**

ग्रा.पं.कार्यालय वडेगाव/बंध्या पंचायत समिती अर्जुनी/मोर. जिल्हा परिषद गोंदिया येथे वसंतराव नाईक तांडा वस्ती योजने अंतर्गत २०२३ -२४ चे निधीतुन मौजा आंभोरा येथे राधाकृष्ण तांडा वस्तीत यशवंत तिरगम ते नत्थूजी पुणेकर यांच्या घरापर्यंत सिमेंट रस्ता बांधकाम करणे या कामाकरिता लागणारे साहित्य बांधकामाच्या जागेवर पोहचते दरानी GST धारक नोंदणीकृत पुरवठाधारक यांचे कडून मोहरबंद द्विलीफाफा पद्धतीने साहित्य खरेदीच्या निविदा मागविण्यात येत आहेत. निवेदेची विस्तृत जाहीरात ग्रा.पं.कार्यालय वडेगाव/बंध्या च्या सूचना फलकावर प्रसिद्ध करण्यात आली असुन निवेदितील अटी व शतीनुसार इच्छुक GST धारक नोंदणीकृत पुरवठाधारक यांनी साहित्य खरेदीच्या निविदा सादर कराव्या. साहित्य खरेदी निविदा बंद लिफाफ्यात सादर कराव्यात. त्याशिवाय निविदा स्वीकारल्या जाणार नाही.

**:- निविदेचे वेळापत्रक -:**

| | | |
|---|---|---|
| १ | निविदा प्रसिद्ध | दि. २७/१२/२०२३ |
| २ | कोरे निविदा प्रपत्र ग्रा.पं.कार्यालयातून प्राप्त करणे.दि.२७/१२/२०२३ ते ०३/०१/२०२४ साय.४.०० वाजे पर्यत कार्यालयीन वेळेत | |
| ३ | निविदा दाखल करण्याची सुरुवात दिनांक | दि.२७/१२/२०२३ |
| ४ | निविदा दाखल करण्याची अंतिम दिनांक | दि.०३/०१/२०२३ साय.५.०० वाजेपर्यत |
| ५ | निविदा उघडण्याचा शक्यतो दिनांक | दि.१४/०१/२०२३ |

**सरपंच** ग्रा.पं.वडेगाव/बंध्या **ग्रामसेवक** ग्रा.पं.वडेगाव/बंध्या

## ग्रामपंचायत कार्यालय दिनकरनगर,पं.स.अर्जुनी/मोर, जि.प.गोंदिया
## जाहीर निविदा सुचना(पहिली वेळ)

जा.क्र. १४१/२०२३ दि.:-२६/१२/२०२३

सर्व इच्छुक कंत्राटदाराना सुचित करण्यात येते की,मासिक सभा ठराव क्र.०८दिनांक ११/१२/२०२३ अन्वये ग्रामपंचायत दिनकरनगर येथे १५ व्या वित्त आयोग निधी(ग्रा.प.स्तर)अंतर्गतची कामे करण्याकरीता मोहरबंद दोन लिफाफा पध्दतीने अनुसुची ब-१प्रमाणे(टक्केवारी दराने)ऑफलाईन निविदा नोंदणीकृत कंत्राटदाराकडून दरपत्रक मागविण्यात येत आहे.तरी निविदा अर्ज फार्म ग्रामपंचायत येथे दिनांक २७/१२/२०२३ ते दिनांक ०५/०१/२०२४(सुटीचे दिवस वगळून)पर्यंत विक्री करिता उपलब्ध आहेत.नमुद केल्याप्रमाणे अटी व शर्तीच्या अधीन राहून कंत्राटदारांनी आपली निविदा सादर करावी.इच्छुक कंत्राटदारांनी आपल्या फर्मची सर्व दस्ताऐवज व दरपत्रके अटी व शर्ती प्रमाणे या नोटीसच्या दिनांकापासून ग्रा.प.कार्यालयात दिनांक ०५/०१/२०२४ ला दुपारी ३.००वाजेपर्यंत ऑफलाईन पध्दतीने सादर करावयाची असून निविदा बाबत इतर सविस्तर माहिती व काहीही अडचण असल्यास ग्रामपंचायत कार्यालास संपर्क साधावे.

**सदर निविदा हि मासिक सभा दि.११/०१/२०२४ ला (शक्य झाल्यास)सर्व संबधितासमोर उघडण्यात येईल.**
**निविदेचा तपशील खालील प्रमाणे आहे.**

| अ.क्र. | कामाचे स्वरुप | अंदाजित किंमत | नमुना ७ निविदा फॉर्मची किंमत | निविदेसोबत भरावयाची अना. रक्कम | काम पूर्ण करण्याचा कालावधी | कंत्राटदाराचे वर्ग |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | मौजा पुष्पनगर ब अगंणवाडी,शौचालय व मुत्रीघर दुरुस्ती करणे | ७५०००/- | ५००/- | ७५०/- | ३ महिने | योग्य त्या वर्गवारीत |
| २ | मौजा पुष्पनगर ब लघुनळ योजना पाईपलाईन वाढ दुरुस्ती करणे(क्रिष्णा मंदीर,कालीमाता मंदिर व अगंणवाडीकरीता | १९९९५८/- | ५००/- | २०००/- | ३ महिने | योग्य त्या वर्गवारीत |
| ३ | ग्रामपंचायत अंतर्गत वार्ड क्रं.१ ते ३ मधील नाली सफाई करणे व मलबा फेकणे | १०००००/- | ५००/- | १०००/- | ३ महिने | योग्य त्या वर्गवारीत |
| ४ | मौजा पुष्पनगर अ मेन रोड ते श्री विजय हाराण मंडल च्या घरापर्यंत बंधीत गटारे बांधकाम करणे | २७६०००/- | ५००/- | २७६०/- | ३ महिने | योग्य त्या वर्गवारीत |
| ५ | दिनकरनगर अंगणवाडी क्रं. १ येथे नळ जोडणी करणे | ६९७८५/- | ५००/- | ६९८/- | ३ महिने | योग्य त्या वर्गवारीत |
| ६ | दिनकरनगर अंगणवाडी क्रं.२ येथे नळ जोडणी करणे | ६९५६९/- | ५००/- | ६९६/- | ३ महिने | योग्य त्या वर्गवारीत |
| ७ | दिनकरनगर मेन रोड ते श्री अनिल भोलानाथ सरदार च्या शेतापर्यंत बंधीत नाली बांधकाम करणे | ४८००००/- | ५००/- | ४८००/- | ३ महिने | योग्य त्या वर्गवारीत |
| ८ | पुष्पनगर अ जि.प.प्राथमिक शाळा व अंगणवाडीला पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करणे व नळ जोडणीकरणे (शाळा,अंगणवाडी व कालीमाता मंदीर) | १५५०००/- | ५००/- | १५५०/- | ३ महिने | योग्य त्या वर्गवारीत |
| ९ | मौजा पुष्पनगर ब अंगणवाडी दुरुस्ती करणे | २३७७९४/- | ५००/- | २३७८/- | ३ महिने | योग्य त्या वर्गवारीत |

**ग्रामसेवक** ग्रामपंचायत दिनकरनगर **सरपंच** ग्रामपंचायत दिनकरनगर


# ३२१ बालके तीव्र कमी वजनाचे

## जिल्ह्यात वाढते कुपोषणाची गती: १७ हजार बालकांचे सर्व्हेक्षण



**गोंदिया:** महिला बालविकास कार्यालय आणि आरोग्य विभागाद्वारे नुकतेच महिला आणि बालकांचे सर्व्हेक्षण करण्यात आले. त्यातून धक्कादायक माहिती समोर आली. जिल्ह्यात १७ हजार १०० बालकांचे वजन घेण्यात आले असून त्यातील ३२१ बालके तीव्र कमी वजनाचे असल्याचे दिसून आले. त्यामुळे जिल्ह्यात कुपोषणाचे आकडे फुगत असल्याचे दिसून येत आहे.

सालेकसा, देवरी, सडक अर्जुनी व अर्जुनी मोरगाव हे तालुके नवसंजीवनी व आदिवासी भागात मोडत आहे. जिल्ह्यात २ लाख ८५ हजार ०३५ एवढी लोकसंख्या नवसंजीवनी योजनेंतर्गत प्रवर्ग असून ३६८ गावे, २३३ ग्रामपंचायत अंतर्भूत आहे. ७ ग्रामीण रुग्णालय, १८ प्राथमिक आरोग्य केंद्र, १२ आयुर्वेदिक दवाखाने, तीन ऍलोपॅथिक दवाखाने, ९३ आरोग्यवर्धिनी उपकेंद्र इत्यादी आरोग्य संस्थांच्या माध्यमातून नवसंजीवनी आदिवासी भागातील जनतेला आरोग्य सेवा पुरविण्यात येत आहेत. नवसंजीवनी व आदिवासी भागात ५१८ अंगणवाडी केंद्र, २६९ आशा सेविका, ४१० प्रशिक्षीत दायी, आठ भरारी पथक, चार फिरते आरोग्य पथकांच्या मदतीने आरोग्य यंत्रणा आरोग्य सेवा बजावीत आहे. दुर्गम भागात राहणाऱ्या आदिवासी जनतेला विशेष करुन माता व बालकांना औषधोपचार वेळीच व नजीकच उपलब्ध होण्यासाठी मानसेवी डॉक्टर योजना (भरारी पथक) अंतर्गत अंगणवाडी मुलांची तपासणी, आजारी मुले, गरोदर, स्तनदा मातांची तपासणी, हिवताप रक्त नमुने, पिण्याचे पाणी-स्त्रोत तपासणी, आश्रमशाळेतील मुलांची तपासणी अशा आरोग्यविषयक बाबी जिल्ह्यात राबविण्यात येत आहेत. जिल्ह्यात शून्य ते पाच वर्षातील १७ हजार १६२ बालके असून १७ हजार १०० बालकांचे वजन घेतलेले आहे. त्यात साधारणत: १५ हजार ३२२, कमी वजनाचे १ हजार ४५७, तीव्र कमी वजनाचे ३२१, उंचीनुसार ९२ सॅम, ३४४ मॅम बालके आ-हेत. यवरुन जिल्ह्यातील कुपोणाचा आकडा फुगत असल्याचे दिसून येत आहे.

### १०२१ मातांना मातृत्व अनुदान

**नवसंजीवनी योजनेंतर्गत विविध आरोग्यविषयक सेवा दिल्या जातात. त्यात मातृत्व अनुदान योजना, भरारी पथक योजना, दायी बैठक योजना, पाणी नमुना तपासणे, पावसाळ्यापुर्वी करावयाचे उपाययोजना, सॅम व मॅम बालकांना आहार सुविधा व त्यांच्या पालकांना बुडीत मजुरी पोटगी ३०० रुपये ईतके अनुदान देण्यात येत आहे. नवसंजीवनी मातृत्व अनुदान योजनेंतर्गत जिल्ह्यात २ हजार ७४० गरोदर मातांची नोंदणी झाली असून पात्र माता १२३० पैकी १०२१ मातांना मातृत्व अनुदानाचे लाभ वितरित करण्यात आले.**

### आरोग्य मंत्र्यांनी घेतला आढावा

**आरोग्यमंत्री दीपक सावंत यांनी आरोग्य विभागाचा १२ डिसेंबर रोजी आढावा घेतला. या बैठकीत मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांसह महिला बालकल्याण विभाग आणि आरोग्य विभागाचे अधिकारी उपस्थित होते. सभेत आदिवासी गावातील आरोग्यविषयक निर्देशांक उंचावणे, लोकांचे क्रियाशील आयुष्य वाढविणे, आदिवासी गावांमध्ये बालमृत्यू, मातामृत्यू व कुपोषणाचे प्रमाण कमी करण्यासाठी जनजागृती वाढविणे, शासकीय योजनांची प्रभावी अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. आदिवासी गावांमध्ये अंगणवाडी सेविका, आरोग्य सेविका, आशा सेविकासोबत सामुदायीक आरोग्य अधिकारी व ग्रामपंचायतीचे पदाधिकारी व पंचसुत्रीच्या सहकार्याने बालमृत्यू, मातामृत्यू व कुपोषण प्रतिबंधात्मक राबविण्याचे निर्देश त्यांनी दिले.**


# कार्यालय नगर परिषद गोंदिया

क्र./नपगो/मुअ/बगिचा/१२९/२०२३
कार्यालय नगर परिषद गोंदिया
दिनांक:-

## (गवत/हिरवीमेहदी/कोटन्स करिता कोटेशन/दर मागविणे बाबत चे नोटिस)

आपणास सुचित करण्यात येत आहे कि, नगर परिषद हद्दितील सुभाष उद्यान/बोडीपरीसर/स्व.श्री इंदिरा गांधी स्टेडियम आणि महाराणा प्रताप गाईन मधिल जास्त प्रमाणात वाढलेली गवत हिरवी मेहदी व कोटन्स कापण्या करिता कोटेशन/दर मागविणे बाबत ईच्छुक कंत्राटदार/शिक्षीत बेरोजगार सेवा सह. संस्था/बचतगट आपले सिलबंद लिफाफे खालील नमूद केल्या प्रमाणे दिनांक ३१/१२/२०२३ ला दुपारी ३.०० वाजे पर्यंत नगर परिषद कार्यालयात किंवा सुभाष गार्डन कार्यालयात सादर करावे.

**टिप:-** १. सर्वात कमीदराचे दरपत्रकाला मान्यता देण्यात येईल.
२. गवत/हिरवीमेहदी/कोटन्स करिता वेगवेगळे दर द्यावे लागेल.
३. सदर कामाचे देयक प्रदान निधीच्या उपलब्धतेनुसार करण्यात येईल.
४. गवत/हिरवीमेहदी/कोटन्स कपात केल्यानंतर निश्चित ठिकाणी कचरा ठेवावा लागेल.
५. कार्य संबंधी जानकारी बगिचा विभाग द्वारे देण्यात येईल.
६. कोटेशन रद्द करण्याचे किंवा स्विकार करण्याचे अधिकार मा. मुख्य अधिकारी नगर परिषद गोंदिया यांच्या जवळ सुरक्षित आहे.
७. कोटेशन मंजूर झाल्यानंतर स्वखर्चाने नियमाप्रमाणे ५००/- चे स्टॅप पेपर वर करारनामा लिहून द्यावा लागेल.
८. गवत/हिरवीमेहदी/कोटन्स कापताना कोणत्याही प्रकारची दुर्घटना घळल्यास नगर परिषद जवाबदार राहणार नाही. जवाबदारी संबंधित संस्थाची राहील.

**मुख्य अधिकारी**
**नगर परिषद गोंदिया**

# ग्राम समृद्धीसाठी मनरेगा अंतर्गत मागेल त्याला कामे द्यावे- मिशन महासंचालक श्री. नंदकुमार

## पात्र लाभार्थ्यांना सिंचन विहिरीचा लाभ देण्यासाठी विचारमंथन कार्यशाळा, मनरेगाची कामे मिशन मोडवर करण्याचे निर्देश

**गोंदिया :** "महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना' ही फक्त रोजगार देणारी नसून तर उत्पादक मत्ता निर्माण करणारी योजना आहे. मनरेगा योजनेअंतर्गत विविध प्रकारच्या वैयक्तिक व सार्वजनिक कामे अनुज्ञेय असून या कामांच्या माध्यमातून गरीब कुटुंबांना समृद्ध व ग्राम समृद्धी करण्यासाठी योजनेची प्रभावी अंमलबजावणी करून मनरेगा अंतर्गत मागेल त्याला कामे द्यावे, असे निर्देश मनरेगाचे मिशन महासंचालक श्री. नंदकुमार यांनी दिले.



मनरेगा योजनेअंतर्गत जास्तीत जास्त नागरिकांना वैयक्तिक कामांचा लाभ देण्याच्या अनुषंगाने व योजनेची अंमलबजावणी मिशन मोडवर करण्यासाठी गोंदिया जिल्ह्यातील सर्व तालुक्यातील गट विकास अधिकारी, तहसिलदार, तालुका कृषि अधिकारी, वनपरिक्षेत्र अधिकारी, बालविकास प्रकल्प अधिकारी, उपअभियंता बांधकाम, सहाय्यक कार्यक्रम अधिकारी, पॅनल तांत्रिक अधिकारी, संगणक परिचालक, ग्राम रोजगार सेवक आणि आशा गट प्रवर्तक यांच्याकरिता जिल्हाधिकारी कार्यालयातील जिल्हा नियोजन समिती सभागृहात आयोजित विचार मंथन कार्यशाळेत मनरेगाचे मिशन महासंचालक श्री. नंदकुमार बोलत होते. जिल्हाधिकारी चिन्मय गोतमारे, जि.प.चे मुख्य कार्यकारी अधिकारी अनिल पाटील, उपजिल्हाधिकारी (रोहयो) चंद्रभान खंडाईत, मनरेगा राज्य प्रशिक्षक निलेश घुगे, मनरेगा राज्य गुणवत्ता नियंत्रक राजेंद्र शहाडे यांची यावेळी प्रामुख्याने उपस्थिती होती.

प्रधानमंत्री यांच्या "हर खेत को पाणी' या संकल्पनेनुसार राज्यातील प्रत्येक शेतकऱ्यांना संरक्षित सिंचनाची व्यवस्था निर्माण व्हावी या उद्देशाने मनरेगा अंतर्गत मागेल "त्या' पात्र लाभार्थ्यांना मोफत सिंचन विहीर देण्यात यावी तसेच पूर्ण झालेल्या कामाचा अकुशल निधी लाभार्थ्यांना जलद गतीने मिळावा यासाठी योजनेची अंमलबजावणी योग्यरित्या करणेबाबत श्री. नंदकुमार यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले.

सदर कार्यशाळेत अधिकारी व कर्मचाऱ्यांना मार्गदर्शन करतांना श्री. नंदकुमार यांनी गोंदिया जिल्ह्यातील सर्व तालुक्यातील जॉबकार्डधारक पात्र अल्पभूधारक शेतकरी बांधवांनी सदर योजनेच्या लाभातून आपले उत्पन्न वाढवावे. "मी समृद्ध तर गाव समृद्ध आणि गाव समृद्ध तर महाराष्ट्र समृद्ध' या अभियानात सहभागी व्हावे, असे आवाहन त्यांनी यावेळी केले.

यापूर्वी सिंचन विहिरीचे उद्दिष्ट कमी आणि जाचक अटींमुळे पात्र शेतकरी लाभापासून वंचित राहायचे. आता सदर योजना सुलभ करण्यात आली असून उद्दिष्ट न ठेवता, मागेल "त्या' पात्र लाभार्थ्यांना सिंचन विहीर देण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. अनुदानाची मर्यादासुद्धा ३ लाखांवरुन ४ लाख करण्यात आली आहे. शेतकऱ्यांचे जीवनमान उंचावण्यासाठी सदर योजनेची व्यापक प्रसिद्धी करून सर्व पात्र लाभार्थ्यांना विनामूल्य मोफत विहीर उपलब्ध करून द्यावी, असे निर्देश त्यांनी यावेळी ग्रामरोजगार सेवकांना दिले.

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत गरिब कुटुंबांना टिकाऊ व उत्पादक मत्ता देऊन कुटुंब समृद्ध करणे, कुटुंब दारिर्द्यरेषेतून वर घेऊन येणे, टिकाऊ व उत्पादक मत्ता निर्माण करणे, कुपोषणमुक्त गाव तयार करणे, शाळाबाह्य विद्यार्थ्यांना शैक्षणिक प्रणालीमध्ये समाविष्ट करणे अशी उद्दीष्ट्ये समोर ठेऊन महाराष्ट्र राज्य गरिबीमुक्त करण्याचे संकल्प आपल्या मनी बाळगून कामे करण्याचे आवाहन श्री. नंदकुमार यांनी उपस्थितांना केले.

प्रत्येक शेतकऱ्याला शाश्वत सिंचनाची सुविधा उपलब्ध करण्यासाठी चालू आर्थिक वर्षात प्रत्येक ग्रामपंचायतीत किमान पंधरा सिंचन विहिरी पूर्ण करण्याचा शासनाचा मानस आहे. शेतकऱ्यांनी उपलब्ध पाण्यापासून दरवर्षी किमान दोनदा पिके घेतली तर त्यांना शेतीपासून चांगले उत्पन्न मिळेल व शेतकरी समृद्ध होईल. तसेच गरिबांना योजनेअंतर्गत सिंचन विहिरीचा लाभ घेऊन शेती केल्यास त्यांना चांगला नफा घेता येईल व भविष्यात मनरेगा योजनेमध्ये मजूर म्हणून काम करण्याची गरज भासणार नाही असे मत मनरेगाचे मिशन महासंचालक श्री. नंदकुमार यांनी यावेळी व्यक्त केले.

मनरेगाचे राज्य प्रशिक्षक निलेश घुगे यांनी महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत क्षेत्रीय स्तरावर मिशन मोडवर सिंचन विहीर योजनेची अंमलबजावणी करण्याच्या अनुषंगाने मार्गदर्शन केले तसेच अंमलबजावणी करतांना उद्भवणाऱ्या अडचणी जाणून घेतल्या व त्यावर सविस्तर चर्चा करुन मार्गदर्शन केले.

# जिल्हा वार्षिक योजना सन २०२४-२५ च्या २७१ कोटी ४९ लाखांच्या प्रारूप आराखड्यास मंजुरी

## राज्यस्तरीय बैठकीत निधी वाढविण्यासाठी प्रयत्न करणार-पालकमंत्री

**गोंदिया:** जिल्हा वार्षिक योजना सर्वसाधारण, अनुसूचित जाती उपयोजना व आदिवासी उपयोजना व आदिवासी क्षेत्र बाह्य योजना अशा तीन्ही योजना मिळून सन २०२४-२५ च्या २७१ कोटी ४९ लाख ९ हजार रुपयांच्या प्रारूप आराखड्यास जिल्हा नियोजन समितीने मंजुरी प्रदान केली असून अंमलबजावणी यंत्रणांनी या निधीमधून जिल्ह्याच्या विकासाचा सर्वकष आराखडा तयार करावा असे निर्देश पालकमंत्री धर्मरावबाब आत्राम यांनी दिले. राज्यस्तरीय बैठकीत सर्व लोकप्रतिनधींच्या सहकार्याने हा आराखडा चारशे कोटी करण्यासाठी प्रयत्न करण्यात येतील अशी ग्वाही पालकमंत्र्यांनी दिली. तसेच सन २०२३-२४ या वर्षीचा खर्च विहित वेळेत करावा असेही त्यांनी सांगितले. जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित जिल्हा नियोजन समिती बैठकीत ते बोलत होते.




खासदार अशोक नेते, सुनील मेंढे, जिल्हा परिषद अध्यक्ष पंकज रहांगडाले, आमदार सर्वश्री ॲड.अभिजित वंजारी, विजय रहांगडाले, विनोद अग्रवाल, मनोहर चंद्रिकापुरे, सहेसराम कोरोटे, समितीचे विशेष निमंत्रीत सदस्य डॉ. परिणय फुके, माजी मंत्री राजकुमार बडोले, माजी आमदार राजेंद्र जैन, गोपालदास अग्रवाल, जिल्हाधिकारी चिन्मय गोतमारे, मुख्य कार्यकारी अधिकारी अनिल पाटील, जिल्हा पोलीस अधीक्षक निखिल पिंगळे, नियोजन उपायुक्त धनंजय सुटे, जिल्हा नियोजन अधिकारी सुनील धोंगडे, सहायक आयुक्त समाज कल्याण विनोद मोहतुरे व प्रकल्प अधिकारी विकास राचेलवार यावेळी उपस्थित होते.

सन २०२४-२५ या वर्षीचा प्रारूप आराखडा सर्वसाधारण योजना १७८ कोटी, अनुसूचित जाती उपयोजना ४६ कोटी व आदिवासी उपयोजना व आदिवासी क्षेत्र बाह्य योजना ४७ कोटी ४९ लाख ९० हजार रुपयांच्या कमाल आर्थिक मर्यादेनुसार निधी प्रस्तावित करण्याच्या सूचना शासनाने दिल्या होत्या. अंमलबजावणी यंत्रणांनी अतिरिक्त मागणी प्रस्तावित केली. आज समितीने प्रारूप आराखड्यास मंजुरी दिली.

लाख निर्मिती प्रकल्प सुरू करण्याबाबत वन विभाग व माविम यांनी समन्वयातून उपाययोजना कराव्यात. लाख निर्मिती प्रकल्पातून जास्तीत जास्त महिलांना रोजगार मिळेल व त्यातून महिलांचे सक्षमीकरण कसे होईल यावर भर देण्याचे निर्देश पालकमंत्र्यांनी दिले.

मानव विकास योजनेअंतर्गत विद्यार्थ्यांसाठी एसटी बसच्या फेऱ्या वाढविण्यासाठी प्रस्ताव सादर करण्यात आल्याचे यावेळी सांगण्यात आले. या प्रस्तावाचा पाठपुरावा करावा असे पालकमंत्री म्हणाले. जलजीवन मिशन अंतर्गत झालेले काम निकषानुसार झाले की नाही तसेच पाणी स्रोत आहेत की नाही याबाबत अहवाल तयार करुन सादर करण्याच्या सूचना यावेळी देण्यात आल्या. गोंदिया जिल्ह्याचे वैभव असलेला "सारस" पक्षी कमी होत असून सारस संवर्धन करण्यासाठी वनमंत्री यांच्यासोबत बैठक लावून याविषयी चर्चा करण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले. ओबीसी मुलांच्या वसतिगृहाची जागा निश्चित केली असून त्याबाबत तात्काळ उपाययोजना करण्याच्या सूचना त्यांनी दिल्या. धानाला वीस हजार रुपये बोनस जाहीर केल्याबद्दल जिल्हा नियोजन समितीने राज्य सरकारच्या अभिनंदनाचा ठराव संमत केला.

जिल्हा सांख्यिकी कार्यालयाच्या वतीने तयार करण्यात आलेल्या गोंदिया जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन या पुस्तकाचे प्रकाशन यावेळी मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

जिल्हा नियोजन समिती सभा २७ ऑक्टोबर २०२३ च्या इतिवृत्तास मंजुरी देण्यात आली. जिल्हा नियोजन समिती सभा २७ ऑक्टोबर २०२३ च्या इतिवृत्तातील कार्यवाही मुद्यांच्या अनुपालन अहवालास सुद्धा समितीने मंजुरी दिली. जिल्हा वार्षिक योजना सन २०२३-२४ अंतर्गत राबविण्यात येणा?या योजनांचा माहे नोव्हेंबर २०२३ अखेर पर्यंत झालेल्या खर्चाचा आढावा यावेळी घेण्यात आला (सर्वसाधारण योजना/ अनुसूचित जाती उपयोजना/ आदिवासी उपयोजना/ओटीएसपी योजना). जिल्हा वार्षिक योजना सन २०२३-२४ च्या पुनर्विनियोजनास समितीने मंजुरी दिली (सर्वसाधारण योजना/ अनुसूचित जाती उपयोजना/ आदिवासी उपयोजना/ओटीएसपी योजना). जिल्हा वार्षिक योजना सन २०२४-२५ च्या प्रारुप आराखड्यास मान्यता देण्यात आली. अध्यक्ष महोदयांचे परवानगीने वेळेवर येणाऱ्या इतर विषयावर समितीमध्ये चर्चा करण्यात आली. बैठकीचे संचलन सुनील धोंगडे यांनी केले.

# पालकमंत्र्याच्या हस्ते जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन २०२३ पुस्तिकेचे विमोचन




**गोंदिया :** जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत पालकमंत्री धर्मरावबाबा आत्राम व इतर मान्यवरांच्या उपस्थितीत जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन २०२३ पुस्तिकेचे विमोचन करण्यात आले. ही पुस्तिका अर्थ व सांख्यिकी संचालनालयाच्या संकेतस्थळावर, जिल्हाधिकारी कार्यालय गोंदिया तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प., गोंदिया यांच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

सदर पुस्तिकेत एकूण अकरा प्रकरणे असून प्रत्येक प्रकरणात जिल्ह्यातील विविध विषयांवरील विस्तृत आकडेवारी उपलब्ध आहे. यामध्ये समालोचन, जिल्ह्यातील निवडक निर्देशक, जिल्हा उत्पन्न अंदाज, जिल्ह्यातील किंमती व सार्वजनिक वितरण व्यवस्था, जमीन व इतर महसूल, स्थानिक स्वराज्य संस्थांचे उत्पन्न/ खर्च, बँक व विमा, बचतगट, कृषिविषयक आकडेवारी, जिल्ह्यातील जलसंपदा व लाभक्षेत्र, वने व पर्यावरण, उद्योग व सहकार, पणन, वस्त्रोद्योग बाबत आकडेवारी, पायाभूत सुविधांमध्ये उर्जा, प्रादेशिक परिवहन व दळणवळण, सार्वजनिक बांधकाम पाणी पुरवठा व स्वच्छता विषयक माहिती. सामाजिक क्षेत्रे व सामुहिक सेवा अंतर्गत शिक्षण, सार्वजनिक आरोग्य, महिला व बालविकास, गृहनिर्माण, सामाजिक न्याय, अल्पसंख्याक विकास, मदत व पुनर्वसन विषयीची माहिती व आकडेवारी. योजनांविषयी आकडेवारीमध्ये विविध विकास योजना, महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजना बाबतची आकडेवारी. संकीर्णमध्ये न्याय व प्रशासन, माहिती व जनसंपर्क, निवडणुकीबाबत, वित्त, पर्यटन बाबत आकडेवारी उपलब्ध आहे.

याशिवाय शेवटच्या विभागात जनगणना, कृषी गणना, पशु गणना व आर्थिक गणनेबाबतची आकडेवारी उपलब्ध आहे. मागील वर्षापासून जिल्ह्यातील धान उत्पादनाबाबतची माहिती तसेच जिल्ह्यातील तेंदूपान संकलनाची माहिती यात समाविष्ट करण्यात आली आहे. सदर पुस्तिकेचा उपयोग विद्यार्थी, संशोधक, सामाजिक कार्यकर्ते, पत्रकार व सामान्य जनतेला निश्चितच होईल अशी अपेक्षा आहे.

# ५९४ शाळांचे होणार मुल्यांकन

**गोंदिया :** जिल्हा परिषदेच्या शाळांतील विद्यार्थ्यांचा शिक्षणचा दर्जा उंचविण्यासाठी जिल्हा परिषदेने आमची शाळा, आदर्श शाळा हा उपक्रम हाती घेतला आहे. या उपक्रमाचा मागोवा व उद्दिष्ट ठरविण्यासाठी जिल्ह्यातील ५९४ शाहांचे मुल्यांकन सुरु करण्यात आले आहे.अंतिम मुल्यांकनानंतर उत्कृष्ट शाळांना पुरस्कृत करण्यात येणार आहे.

गोंदिया जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शिक्षण विभाग व तिरोडा येथील अदानी फाऊंडेशनच्या संयुक्त विद्यमाने २०१९-२० पासून जिल्हास्तरावर आमची शाळा, आदर्श शाळा राबविण्यात येत आहे. या उपक्रमाची परिणामकरता व यशस्वीता लक्षात घेऊन २०२३-२४ या वर्षात उपक्रमाच्या तिसऱ्या टप्पा अदानी फाऊंडेशनच्या वतीने जिल्ह्यातील ५९४ शाळांमध्ये राबविण्यात येत आहे.

शाळेत उपलब्ध भौतिक सुविधा, शाळेप्रती लोकसहभाग, विद्यार्थ्यांच्या लाभाकरिता राबविण्यात येणाऱ्या शासकीय योजना, विविध स्पर्धा परीक्षेचे आयोजन, विद्यार्थ्यांची आकलन शक्ती यावर आधारित १०० गुणांच्या प्रश्नावलीद्वारे शाळांचे मुल्यांकन करण्यात येत आहे.

५९४ प्राथमिक शाळांचे मुल्यांकन केंद्रप्रमुखांद्वारे करुन ८८ केंद्रातून प्रथम क्रमांकाच्या शाळांची निवड तालुका मुल्यांकनासाठी करण्यात येणार आहे. केंद्रातून प्रथम येणाऱ्या शाळांना अदानी फाऊंडेशनतर्फे ५ हजार रुपये बक्षीस देण्या येणार आहेत. तसेच तालुक्यातून प्रथम व द्वितीय शाळांना अनुक्रमे ५१ व ३५ हजार रुपये व स्मृतिचिन्ह देण्यात येणार आहे. तालुकास्तरावर उत्कृष्ट ठरलेल्या शाळांची जिल्हास्तरीय उत्कृष्ट शाळेसाठी निवड होणार आहे.

# दुर्गम व आदिवासी भागातील शेतकऱ्यांनी घेतला शेततळी योजनेचा लाभ

**गोंदिया :** गोंदिया जिल्हा हा धानाचा जिल्हा म्हणून ओळखला जातो. या जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात धानाची शेती केल्या जाते. परंतु निसर्गाचा लहरीपणा, पावसाचा अनियमितपणा, यामुळे धान पिकाचे मोठ्या प्रमाणावर नुकसान होते. यावर मात करण्यासाठी शासनाने शेतकऱ्याला सिंचनाचे महत्वाचे साधन म्हणून पाहिली जाणारी योजना म्हणजे शेततळी योजना. शेततळीसाठी शासनाच्या विविध योजनामधून अनुदान दिले जाते. यामध्ये महत्वाची योजना म्हणजे मुख्यमंत्री शाश्वत कृषि सिंचन योजनेअंतर्गत वैयक्तिक शेततळी. या योजनेमध्ये शेतकऱ्यांना अनुदानावर शेततळीचा लाभ दिला जातो. शेतकऱ्यांनी या योजनेचा लाभ घेण्याकरीता महाडीबीटी पोर्टलवर अर्ज करुन जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी या योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन देवरी उपविभागीय कृषि अधिकारी मंगेश वावधने यांनी केले आहे.

देवरी तालुक्याच्या दक्षिणेस ४० किलोमीटर अंतरावर बसलेले सुंदरी हे गाव दुर्गम व आदिवासी बहुल क्षेत्र असून शेतकरी पारंपारिक पध्दतीने भाताची शेती करतात. भाताची शेती ही पुर्णत: कोरडवाहू व पावसाच्या पाण्यावर अवलंबून आहे. पावसाने साथ दिली तर बरे, नाहीतर दुष्काळी परिस्थिती निर्माण होते. अशावेळी उदरनिर्वाहाकरीता शहराची वाट धरावी लागते.

यावर मात करण्यासाठी या गावचे कृषि सहाय्यक हेमराज वाढई, तालुका कृषि अधिकरी लालन राजपुत, उपविभागीय कृषि अधिकारी मंगेश वावधने यांचे मार्गदर्शनाखाली हिरालाल फिरतु कातलाम रा. सुंदरी, ता. देवरी यांना सर्व्हे क्र.१२१/१ मध्ये २५x२५x३ मीटर आकारमानाचे शेततळी प्रधानमंत्री कृषि सिंचन योजनेअंतर्गत शेततळीचा लाभ देण्यात आला. त्यांनी शेततळीच्या बांधावर तुर पिकाची लागवड केली आहे. तसेच भात पिकाला गरजेनुसार संरक्षित पाणी दिले आहे. शिवाय भात पिकानंतर परसबागेत भाजीपाला पिकाची लागवड केली आहे. या शेततळ्यातील पाण्याचा वापर करुन पिकामध्ये संरक्षित पाणी देण्यासाठी या शेततळ्याचा वापर होतो. शिवाय फळबाग, फुलशेती, भाजीपाला तसेच शिंगाळा यासारखी पिके घेवून हमखास उत्पन्न मिळविणे शेतकऱ्यांना सहज शक्य होते.

वैयक्तिक शेततळी लाभार्थी पात्रता निकष : अर्जदार शेतकऱ्याकडे स्वत:च्या नावावर किमान ०.६० हेक्टर क्षेत्र जमीन असणे आवश्यक आहे. शेतकऱ्याची जमीन शेततळी खोदण्यास तांत्रिकदृष्ट्या योग्य असावी.

आवश्यक कागदपत्रे : जमिनीचा सातबारा, गाव नमुना ८-अ, आधार कार्ड, बँक पासबुक झेरॉक्स. शेतकऱ्यांनी mahadbt.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर सी.एस.सी. केंद्रावरुन ऑनलाईन अर्ज करावा. महाडीबीटी पोर्टलवर प्राप्त अर्जांमधून संगणकीय प्रणालीद्वारे सोडतीने निवड होईल. अधिक माहितीकरीता कृषि विभागाच्या क्षेत्रीय पातळीवर काम करणारे कृषि सहाय्यक, कृषि पर्यवेक्षक, मंडळ कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी यांचेशी संपर्क साधावा.

# बरौनी एक्सप्रेसच्या सालेकसा स्टेशनवरील थांब्यामुळे तीन राज्यातील प्रवाशांची सोय

**सालेकसा :** गडचिरोली-चिमूर लोकसभा क्षेत्रातील दुर्गम, मागास म्हणून ओळखल्या जाणाऱ्या परंतू महाराष्ट्रासह मध्यप्रदेश आणि छत्तीसगड राज्याच्या सीमेवरील महत्वाच्या सालेकसा रेल्वे स्थानकावर अखेर १५२३१/१५२३२ गोंदिया-बरौनी या एक्सप्रेस रेल्वेगाडीचा थांबा मंजूर करण्यात आला. या थांब्याचा शुभारंभ खा.अशोक नेते यांच्या हस्ते हिरवी झेंडी दाखवून करण्यात आला.

बरौनी एक्सप्रेस सालेकसा स्थानकावर येताच खा.नेते यांनी चालकाला पुष्पगुच्छ देऊन आणि त्याचे तोंड गोड करत स्वागत केले. यानंतर त्यांनी गाडीला हिरवी झेंडी दाखवून रवाना केले. ४० वर्षांपासूनची रेल्वे प्रवाशांची मागणी पूर्ण करण्यासाठी खा.अशोक नेते यांनी पुढाकार घेतल्याने नागरिकांनी त्यांचे आभार व्यक्त केले.

तीन राज्यांच्या सीमेवर असलेल्या या रेल्वे स्थानकावर मोजक्याच एक्सप्रेस गाड्यांचा थांबा आहे. त्यामुळे सीमावर्ती भागातील रेल्वे प्रवाशांची अडचण होत होती. मुंबई-कोलकाता या मुख्य मार्गावरील सालेकसा स्थानकावर एक्सप्रेसला थांबा द्यावा यासाठी ४० वर्षांपासून रेल्वे प्रवाशांकडून मागणी केली जात आहे. दरम्यान या भागातील प्रवाशांसाठी



महत्वाच्या असलेल्या बरौनी एक्सप्रेसच्या थांब्यासाठी खा.नेते यांनी रेल्वे मंत्रालयाकडे वारंवार पाठपुरावा केला. काही दिवसांपूर्वीच त्यांनी रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांची भेट घेतली होती. अखेर त्यांच्या पाठपुराव्याला यश आले. त्यामुळे नागरिकांमध्ये आनंद व्यक्त केला जात आहे. या थांब्यामुळे कर्मचारी, विद्यार्थी, शेतकरी, व्यापारी अशा सर्व वर्गाची गैरसोय दूर होणार आहे.

# सशस्त्र दुरक्षेत्र गोठणगांवच्या वतीने आदिवासी भागातील विद्यार्थी व कुटुंबांना उबदार कपडे वाटप

## . कम्युनिटी पोलीसींग दादालोरा एक खिडकी योजनेंतर्गत कार्यक्रम

**गोंदिया,** : जिल्हयामध्ये सध्या तापमानाचा पारा एकदम खाली गेलेला असून नागरिकांना असह्य थंडीचा त्रास सहन करावा लागत आहे. सशस्त्र दुरक्षेत्र गोठणगांव यांचेतर्फे परिसरातील आदिवासी अतिदुर्गम भागातील गंधारी, उमरपायली, जांभळी, डोंगरगाव येथील अंगणवाडी व जिल्हा परिषद शाळेतील १३० विद्यार्थ्यांना उबदार स्वेटर व जॅकेट तसेच सशस्त्र दुरक्षेत्र गोठणगांव अंतर्गत गावांमधील गरजू १०० कुटुंबांना उत्कृष्ट दर्जाची ब्लॅन्केट भेट म्हणून दिली. सदर उबदार स्वेटर, जॅकेट व ब्लॅन्केटची भेट सशस्त्र दूरक्षेत्र गोठणगाव यांनी उडान ग्रुप गोंदिया व सहयोग ग्रुप गोंदिया यांचे सहकार्याने दिली.



जिल्हा पोलीस अधीक्षक निखील पिंगळे यांच्या संकल्पनेतुन सशस्त्र दुरक्षेत्र गोठणगांव यांचे वतीने कम्युनिटी पोलीसींग दादालोरा एक खिडकी योजने अंतर्गत विविध कार्यक्रम आयोजित केले जातात. त्या अंतर्गत शालेय विद्यार्थी व गरीब कुटुंबांना स्वेटर व ब्लॅन्केट वाटपाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

सदर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अमोल गायकवाड, समादेशक, भारत राखीव बटालीयन २ बिरसी कॅम्प गोंदिया हे होते. अध्यक्षीय भाषणामध्ये त्यांनी सशस्त्र दूरक्षेत्र गोठणगाव यांच्या वतीने करण्यात येत असलेल्या विविध उपक्रमांचे कौतुक केले व यापुढे सुध्दा असेच उपक्रम राबवावेत जेणेकरून अतिदुर्गम भागातील सामान्य नागरिक मुख्य प्रवाहामध्ये येवू शकतील असे ते म्हणाले. तसेच उडान ग्रुप व सहयोग ग्रुप गोंदिया यांच्या कामाचे सुध्दा त्यांनी कौतुक केले. शितल रमादे अध्यक्षा, उडाण ग्रुप गोंदिया यांनी आपल्या भाषणामध्ये संस्था पे बॅक टू सोसायटी या संकल्पनेवर काम करीत असल्याचे सांगून विशेषतः महिला सबळीकरण व सक्षमीकरण यावर जास्त भर देत असल्याचे नमुद केले. मात्र प्रथमच नक्षलग्रस्त भागातील गरजू व्यक्तींना मदत करतांना अतिशय आनंद होत असल्याचे त्यांनी सांगितले. याप्रसंगी सहयोग हॉस्पीटलचे संचालक रमन रमादे, सहयोग ग्रुप ऑफ स्कुलचे जे. के. लोखंडे, पोलीस स्टेशन केशोरीचे ठाणेदार सोमनाथ कदम यांनी मनोगत व्यक्त केले.

सदर कार्यक्रम संकेत देवळेकर उपविभागीय पोलीस अधिकारी देवरी, सोमनाथ कदम ठाणेदार पोलीस ठाणे केशोरी, रमन रमादे संचालक सहयोग ग्रुप, शितल रमादे अध्यक्षा उडाण ग्रुप, डॉ. सौरभ वरधानी सेंटर हेड सहयोग हॉस्पीटल, एच. आर. सिंग पोलीस निरीक्षक केशोरी, कुसुम चतुर्वेदी, स्मिता सावंत उपाध्यक्षा उडाण ग्रुप, प्राजक्ता डोंगरवार,राधिका बावरिया सचिव उडाण ग्रुप, सलोनी खंडेलवाल खजिनदार उडाण ग्रुप यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडला.

कार्यक्रमाचे सुत्रसंचालन पोलीस उपनिरीक्षक सुनिल चव्हाण यांनी केले तर प्रास्ताविक सशस्त्र दूरक्षेत्र गोठणगावचे प्रभारी अधिकारी सचिन घाटे यांनी व उपस्थितांचे आभार पोलीस उपनिरीक्षक शुभम नवले यांनी मानले.

## रेशन दुकानदारांची सभा २७ डिसेंबरला;१६ जानेवारीपासून दिल्ली येथे धरणा प्रदर्शन

**गोंदिया :** रेशन धान्य दुकानदारांच्या मागण्या अजून सुटलेल्या नाहीत. पूवीपेक्षा कामामध्ये वाढ झाली असताना दुकानदारांच्या गल्लयात एक रुपयाही रोखीने पडत नसल्याने रेशन दुकानदारांना दिवसाचा खर्च भागवणेही कठीण झाले. अशा परिस्थितीत राज्य सरकारने वेळेत उपाययोजना कराव्यात अशा आदी मागण्यांसाठी १ जानेवारीपासून बेमुदत आणि १६ जानेवारीपासून दिल्ली येथे धरणा प्रदर्शन करण्यात येणार आहे. या संदर्भात चर्चा करण्यासाठी २७ डिसेंबरला स्थानिक विश्राम गृह येथे सभेचे आयोजन करण्यात आले आहे.

कोरोना काळापासून रेशन दुकानदारांच्या कामाचे स्वरूप वाढवताना रेशन दुकानदारांच्या उत्पन्नात काहीही बदल झालेला नाही, उलट वाढत्या महागाईनुसार तोटाच होत आहे. रेशन दुकानदारांच्या समस्या सोडवण्यात सातत्याने दुर्लक्ष होत आहे. या समस्या वेळेत सोडवल्या न गेल्यास दुकाने बंद करावे लागतील, अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. यामुळे रेशन दुकानदार संघटनेच्या वतीने १ जानेवारीपासून बेमुदत आणि १६ जानेवारीपासून दिल्ली येथे धरणा आंदोलन करण्यात येणार आहे.

# ब्रिटीशकालीन हवाईपट्टीवर गोंदियाकरांचे उड्डाण

## ८३ वर्षानंतर चमकले बिरसी विमानतळाचे भाग्य: विमानेसेला सुरुवात

**गोंदिया:** नुकतीच १ डिसेंबर रोजी जिल्ह्यातील बिरसी विमानतळावरुन




प्रवासी वाहतूक सेवेला सुरुवात झाली. दिमाखदार सोहळ्यात माजी केंद्रीय नागरी उड्डयणमंत्री खा. प्रफुल्ल पटेल यांनी हिरवी झेंडी दाखवून या विमानेसेवेच शुभारंभ केला. अन ब्रिटीश काळात निर्माण करण्यात आलेल्या या हवाईपट्टीवरुन गोंदियाकरांचे उड्डाण सुरु झाली. विशेष म्हणजे, गेल्या वर्षी मार्च २०२२ मध्येही या विमानतळावरुन प्रवासी विमान वाहतूक सेवा सुरु करण्यात आली. मात्र केवळ पाच महिन्यानंतरच मिशन फेल झाले. त्यात आता नव्या दमाने सुरु झालेल्या या विमानसेवेला सात दिवस लोटले असून तब्बल ८३ वर्षानंतर या विमानतळाचे भाग्य चमकले असेच म्हणता येईल.

विमान वाहतूक दिनाच्या दिनाच्या निमित्ताने बिरसी विमान तळाचा इतिहास पहता रॉयल इंडियन एअर फोर्सचा हवाई तळ म्हणून १९४० मध्ये दुसऱ्या महायुद्धादरम्यान ब्रिटीशांनी ही हवाईपट्टी बांधली होती. मात्र, या विमानतळाचे काम पूर्ण होण्याआधीच दुसरे विश्वयुद्ध समाप्त झाले. आणि या विमानतळाचे काम अपूर्ण राहिले. दरम्यान, स्वातंत्र्यानंतर सुरुवातीच्या काळात सार्वजनिक बांधकाम विभागाद्वारे या विमानतळाचे कारभार चालवले गेले. त्यात ऑगस्ट १९९८ ते डिसेंबर २००५ मध्ये महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने (एमआयडीसी) या विमानतळावर ताबा घेतला. तर मग भारतीय प्राधिकरणाने २०१३ मध्ये एअरबस ए ३२० आणि बोईंग ७३७ सारखी मोठी विमाने हाताळण्यासाठी एएआयने विमानतळावरील धावपट्टी ७५०० फुटापर्यंत वाढवली. मात्र त्यापुर्वीच खा. प्रफुल्ल पटेल यांनी २००४ या वर्षी केंद्रीय नागरी उड्डाणमंत्रीचे पदभार स्विकारताच या विमानतळाचा कायापालट करण्याचे ठरविले. त्यामुळेच हे विमानतळ नॅशनल प्लाइंग ट्रेनिंग इन्स्टिट्युट (एनएफटीआय) चे घर झाले. जेथे सामान्य विमानचालक आणि पायलट प्रशिक्षणाचे प्रयोजन केले जाते. दरम्यान, मार्च २०२२ मध्ये, प्रादेशिक विमान कंपनी, प्लायबीगतर्फे या विमानतळावरुन सरकारच्या उड्डाण योजनेंतर्गत इंदूर आणि हैदराबादसाठी नियमित आणि थेट उड्डाण सेवा सुरु केली. मात्र, केवळ पाच महिने चालविन्यानंतर काही कारणामुळे एअरलाईनने ऑगस्ट २०२२ मध्ये अनिश्चित काळासाठी सेवा थांबविली. तेव्हापासून हे विमानतळ निष्क्रीय राहिले. दरम्यान, ऑक्टोबर २०२३ मध्ये, भारतातील सर्वात मोठी विमान कंपनी इंडीगो ने १ डिसेंबर २०२३ पासून हैदराबाद व तिरुपतीसाठी नवीन उड्डाणे सुरु करुन विमानतळावरील व्यवसायीक कामकाज पुन्हा सुरु केले. त्यामुळे आता गोंदियावरुन थेट हैदराबाद व तिरुपतीला उड्डाण भरणे शक्य झाले असून येत्या काळात मुंबई, पुणे आदि मोठ्या शहरासाठीही या विमानतळावरुन विमानाने प्रवास करता येणार आहे. एकंदरित ८३ वर्षाच्या प्रदीर्घ कालावधीनंतर बिरसी विमानतळावरुन उडण्याचे गोंदियाकरांचे स्वप्न साकार झाले आहे.

### असे पोहोचा विमानतळावर

**बिरसी विमानतळ हे गोंदिया शहरापासून ईशान्य दिशेला १२ किमी अंतरावर कामठा या गावाला लागून असून गोंदिया रेल्वेस्थानक व बसस्थानकापासून विमानतळावर जाण्यासाठी एसटी बस, ऑटो रिक्शा आदी प्रवासी वाहनांची सोय आहे.**

### घडत आहेत पायलट

**बिरसी विमातळावर प्रवासी विमान वाहतूक सेवा सुरु होण्याआधी २००५ नंतर या विमानतळावर नॅशनल फ्लाईंग ट्रेनिंग इन्सिटयुटतर्फे पायलट प्रशिक्षणाला सुरुवात झाली. या माध्यमातून पायलट घडून देशात सेवा देत आहेत. आजघडीला विमानतळ प्राधिकरणात सुमारे साडेतीनशे अधिकारी-कर्मचारी असून ७ इंस्ट्रक्टरतर्फे प्रशिक्षण केंद्रातील ७८ व रायबरेली येथील १२ असे ९० प्रशिक्षीत पायलट प्रशिक्षण घेत आहेत. तर त्यासाठी २२ पायलट प्रशिक्षण विमान उपलब्ध करुन देण्यात आले आहे. अशी माहिती विमानतळ संचालक शफिक शाह यांनी दिली.**